# ॥ विठोबाअण्णा दप्तरदार ॥



**विद्याधर पुरुषोत्तम गोखले**



# लेखक

•

विद्याधर पुरूषोत्तम गोखले

•

जन्म : १७ जानेवारी १९३८

•

शिक्षण : एम. ए. बी. एड्.

•

कऱ्हाड येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळांत व महाविद्यालयांत अध्यापन.

•

कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेत मुख्य कार्यकारी, उपाध्यक्ष, संचालक.

•

महाराष्ट्र वाङ्मय मंडळाचे कार्यकारी विश्वस्त.

•

साहित्य, नाट्य, पत्रकारिता, समाजसेवा यांची आवड, वृत्तपत्रांतून प्रासंगिक लेखन, स्मरणिका-गौरविकांचे संपादन

•

'बाबा राधवदास' (चरित्र), 'कऱ्हाड : समग्र दर्शन' पुस्तकांचे लेखन.

•

# विठोबाअण्णा दप्तरदार

**लेखक**

विद्याधर पुरुषोत्तम गोखले

**विठोबाअण्णा दप्तरदार**

**आवृत्ती पहिली :**
३० जानेवारी २०१४

**प्रकाशक :**
**विद्याधर पुरुषोत्तम गोखले**
४३६, सोमवार पेठ,
कऱ्हाड - ४१५ ११०.
फोन : ०२१६४-२२१४१५
मोबा.: ९८५०८८४४३४

**मुखपृष्ठ :**
**धनंजय कुलकर्णी**
स्क्वेअर ॲडव्हर्टायझिंग, कऱ्हाड

**अक्षरजुळणी :**
**आर. जी. देशपांडे**
राज डी.टी.पी. कऱ्हाड.

**मुद्रक:**
**श्रीधर रघुनाथ कुलकर्णी**
**विद्याधर श्रीधर कुलकर्णी**
श्रीधर मुद्रणालय,
३३८, सोमवार पेठ, कऱ्हाड - ४१५११०.
फोन : ०२१६४-२२२७४६
मोबा.: ९८९०४९८४९७

**मूल्य :**
रु. ५०/-

## मनोगत

सत्तर वर्षांपूर्वीचा काळ असेल. कऱ्हाडात आता यशवंतराव चव्हाणांची समाधी प्रीतिसंगमावर कृष्णाकाठी आहे. तो परिसर त्यावेळी स्वामीची बाग म्हणून ओळखला जायचा. त्या बागेत परिपूर्णानंद स्वामींची समाधी असलेल्या मंदिरात काकडआरतीचा कार्यक्रम असायचा. तबला, पेटी-झांजांच्या तालावर सुरेल स्वरांत भजनं, पदं, आरत्या म्हणत असत. थंडीच्या दिवसात, पहाटेच्या मंद प्रकाशात बरोबरीच्या इतर मुलांप्रमाणं मीही या काकडआरतीच्या कार्यक्रमाला हजेरी लावत असे. त्या हजर राहण्यात भावभक्तीपेक्षा आरतीनंतर मिळणाऱ्या मधुर पंचामृताचंच आकर्षण मला असायचं. पण त्या पंचामृताएवढेच मधुर असलेलं 'हरि हा आनंदाचा कंद' हे पद तेव्हापासून कानांवर पडलेलं मनातही घर करून राहिलं आहे. पुढं शाळेत शिकत असताना माझ्या वडिलांनी (पुरूषोत्तम पांडुरंग ऊर्फ बाबुराव गोखले यांनी) लिहिलेलं 'साहित्यिक कऱ्हाड' पुस्तक वाचताना ते पद कऱ्हाडच्याच विठोबाअण्णा दप्तरदारांचं असं समजलं.

बाबुरावांनी 'साहित्यिक कऱ्हाड' मध्ये लिहिले होते, ''संतवाङ्मयापेक्षा पंतवाङ्मयानेच कऱ्हाडचे नाव, महाराष्ट्रभर दुमदुमविले. 'सुश्लोकलाघवा' दि ग्रंथाचे कर्ते आणि आणि आपल्या संस्कृत, प्राकृत नि संत-पंडित समन्वयी मराठी पद्यांनी 'पहिले ते हरिकथानिरूपण' महाराष्ट्रभर सुरस चमत्कृतिप्रमोदांनी प्रफुल्ल आणि वेदान्तव्यवहाराची वक्तृत्वपूर्ण जोड घालून सर्वार्थांनी 'परमार्थी' करून सोडणारे विठोबाअण्णा (बेंद्रे) दप्तरदार (१८१४ ते १८७३) यांचे वाङ्मय भावनांचा खळखळाट, बुध्दीचा चमचमाट आणि सात्त्विक भावांचा लखलखाट असा उंचावते की, संसाऱ्यांनी स्थितप्रज्ञ व्हावे आणि स्थितप्रज्ञांनी संसाराला सरसावावे. 'कोटि-कोटि-कंदर्प-रूप-लावण्य-दर्पहर, ध्यानमनोहर, अनंतजन्म मनोमलपटली निर्मूलनकर, भक्तिगम्य तापत्रयभंजन, आसेचनक, ध्यानि पाहता वाटे. जणू नथनांत भरावे, हुंगावे, दृढ आलिंगावे की चुंबावे, विसरतसे संसार सर्वही संत तयाचा पंत विठ्ठला सहज लागला छंद। हरि हा आनंदाचा कंद ॥', या विठोबाअण्णांच्या काव्यपंक्ती सखोल अभ्यासाने वाचण्याचा प्रयत्न करील त्याला शब्दाशब्दाच्या अनुक्रमाने सविकल्प समाधीचाच नुसता नव्हे तर तन्मयतेचा अनुभव आल्याशिवाय खास राहणार नाही आणि स्वरूप सुंदरतेने तन्मय झालेला आधुनिक पिसादेखील त्या सुंदरतेला 'वाटे जणू नयनांत भरावे, हुंगावे, दृढ आलिंगावे, चुंबावे, विसरतसे संसार सर्वही' यापेक्षा दुसऱ्या कशाची इच्छा करेल? आणि म्हणूनच पंडितवाङ्मयाची परंपरा राखणारे, संतवाङ्मयाचा ओलावा ओथंबविणारे आणि रसा-रसांचा

प्रीतिसंगम साधून आरोहवरोहांनी कानाला, सूक्ष्मतेने ध्यानाला आणि नाजूक संवेदनांनी भानाला हरपवून सोडणारे पंतवाङ्मय नुसते दप्तरात ठेवण्याच्या लायकीचे न ठरता कऱ्हाडची तरफदारी आसेतुहिमाचल करण्याचा विक्रम गाजवून बसले.'' (पृ. २०-२१)

'साहित्यिक कऱ्हाड'मधील हा मजकूर वाचल्यापासून विठोबाअण्णांच्या पदांचा शोध घेण्याचा मी प्रयत्न करीत होतो, पण त्यावेळी तरी कदाचित शालेय-महाविद्यालयीन अभ्यास आणि अभ्यासेतर उपक्रमांत गुंतत गेल्यामुळं थोडं दुर्लक्षही झाले. त्यामुळे मी ज्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत होतो, त्या शाळेत चित्रकला शिकविणारे राजे मास्तर आणि माधवराव गोपाळराव देशपांडे हे विठोबाअण्णांशी संबंधित असे समजूनही त्यांच्याशी या बाबतीत संवाद साधला नाही. दरम्यान केव्हा तरी कृष्णेच्या वाळवंटातल्या स्मशानालगतच्या मारूतीला 'मढ्या मारूती' म्हणायचं नाही, 'वीर मारूती' म्हणायचं असं बाबुरावांकडून समजावलं गेलं. तेव्हा ते देऊळ बांधणाऱ्या आपटे पैलवानांच्या सहकाऱ्यांमध्ये विठोबाअण्णांचं नाव ऐकलं होतं.

आणि मग १९७५ साली कऱ्हाडास अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीवेळी या साऱ्या स्मृती जागृत झाल्या. विठोबाअण्णांविषयी थोड्याशा विस्तारानं संमेलनाच्या 'स्मरणिके'त लिहिण्याचा विचार होता. माझे ग्रंथपाल मित्र विठ्ठलराव पाटील यांना विठोबाअण्णांचे साहित्य मिळवून देण्यासाठी मी बोललो. त्यांनी खटपट करून बेळगावातून विठोबाअण्णांच्या 'पदसंग्रहा'ची कशीबशी एक प्रत पैदा केली. ( त्या पुस्तकाची त्यावेळी झेरॉक्स करून आणलेली एक प्रत माझ्या संग्रहात आहे.) विठ्ठलराव पाटलांनी सांगितलं, भारत इतिहास संशोधक मंडळातील राजवाडे की खरे, भावे किंवा आणखी कोणी संशोधक असतील, विठोबाअण्णांचं साहित्य मिळविण्यासाठी कऱ्हाडातील त्यांच्या घरी आले होते. विठोबाअण्णांचे साहित्य ओझर्डे गावी त्यांच्या नातीकडे आहे असे समजल्यावरून त्यांनी त्यावेळेची वाहतुकीची साधनं लक्षात घेता अक्षरश: पायपीट केली. पण त्यांनी हात जोडून विनंती करूनही त्यांच्या हाती काही मिळाले नाहीच. 'येथेच बसून पाहतो' या विनंतीलाही वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या आणि विठोबाअण्णांची साहित्यसंपदा बासनातच राहिली. दैवदुर्विलास असा की नंतर १९४८ साली गांधी-वधोत्तर झालेल्या जाळपोळीत त्या अक्षरवाङ्मयाची राखरांगोळी झाली. विठ्ठलराव पाटलांनी सांगितलेल्या या कर्मकहाणीने खिन्न झालो. साहित्य संमेलनातील सरचिटणीस- पदाचीच कामगिरी गळ्यात पडल्यामुळे विठोबाअण्णांविषयी स्मरणिकेत लिहावयाच्या लेखाचे काम बाजूला पडले ते पडलेच. एक मात्र झाले. विठोबाअण्णांचे 'आनंदाचा कंद' हे पद ह.भ.प. रामभाऊ कऱ्हाडकरांकडून

संमेलनाच्या शुभारंभीचे 'ईशस्तवन' म्हणून सादर करवून औचित्य साधता आले.

नोकरी-व्यवसायांच्या विविध वाटा-वळणांच्या प्रवासानंतर, ज्या गावानं आपल्याला घडविलं, खूप काही दिलं, त्या गावाचं आपण काही देणं लागतो म्हणून २००८ साली माझे मित्र प्रा. का. धों. देशपांडे यांच्या सहकार्याने 'कऱ्हाड : समग्र दर्शन' हा ग्रंथ सिध्द केला, त्या ग्रंथात साहित्य कला या विषयांच्या अनुषंगानं विठोबाअण्णांचा उचित उल्लेख केला होताच. त्या ग्रंथाच्या 'मनोगता'त आम्ही म्हटलं होतं की, 'कऱ्हाडसारखी गावं मोठी होतात, ती त्या गावातील माणसांमुळं, त्यांच्या कर्तबगारीमुळं', आणि कऱ्हाडचं नाव करणाऱ्या कर्तबगारांत विठोबाअण्णांचा नामोल्लेखही अग्रक्रमाने केला होता.

जून २०१३ मध्ये माझ्या वैयक्तिक पुस्तकां-कात्रणां-टिपणांचा पसारा आवरत असताना विठोबाअण्णांच्या 'पदसंग्रहा'ची झेरॉक्स प्रत हाती लागली. ती चाळत असताना लक्षात आलं की विठोबाअण्णांचा जन्म शके १७३५ मधला. दिनदर्शिकेकडे पाहिल्यावर लक्षात आलं की सध्या १९३५ हा शक चालू आहे, म्हणजे विठोबाअण्णांच्या जन्माला या वर्षी दोनशे वर्षं पूर्ण होत आहेत. अडतीस वर्षांपूर्वीचा संकल्प या निमित्तानं प्रत्यक्षात आणता येईल.

सिध्देश्वरशास्त्री चित्राव यांचा 'अर्वाचीन भारतीय चरित्रकोश', महादेवशास्त्री जोशी यांचा 'भारतीय संस्कृति-कोश' या संदर्भग्रंथांतून व अन्यत्रही विठोबाअण्णांचा काळ इ.स. १८१३-१८७३ असा नमूद केला आहे. शकवर्षात ७८ मिळवून इसवी सन येतो या कालगणना संकेताप्रमाणे वरवर पाहता विठोबाअण्णांचा जन्मशक १७३५ म्हणजे इसवी सन १८१३ हे बरोबर वाटत असले तरी 'शक' वर्षाची सुरु वात चैत्री पाडव्याला म्हणजे इसवी सनाच्या मार्च-एप्रिलमध्ये होते म्हणून सामान्यत: पौष-माघ-फाल्गुन या महिन्यांचा शकाचा इसवीसनाशी मेळ घालण्यासाठी शक वर्षात ७८च्या ऐवजी ७९ मिळवावे लागतात. त्यामुळे विनोबाअण्णांचे इसवीसनातील जन्मवर्ष १८१४ असे निश्चित केले आहे. बाबुरावांच्या 'साहित्यिक कऱ्हाड' मध्ये त्यांनी १८१४-१८७३ असाच विठोबाअण्णांचा काळ नोंदला आहे.

कृष्णाजी नारायण आठल्ये (१८५२-१९२९) हे कवी, टीकाकार, निबंधकार, चित्रकार होते. शंकराचार्यांनी त्यांना 'महाराष्ट्रभाषाचित्रमयूर' ही पदवी दिली होती. त्यांनी 'केरळकोकिळ' नावाचे मासिक पहिली पाच वर्षे कोचीनमधून व नंतर मुंबईतून प्रसिध्द केले. सुमारे पंचवीस वर्षे (१८८७-१९१२) हे मासिक निघत असे.

विठोबाअण्णा दप्तरदार यांचे विस्तृत चरित्र कृष्णाजी नारायण आठल्ये यांनी त्यांच्या 'केरळकोकिळ' मासिकाच्या सातव्या वर्षाच्या नवव्या अंकात ( सप्टेंबर १८९३) प्रसिध्द

केल्याचा उल्लेख आहे. स्वत: आठल्ये यांनी विठोबाअण्णांचा 'सुश्लोकलाघव' हा संस्कृत ग्रंथ त्यांनी स्वत: केलेल्या भाषांतरासह जुलै १९१७ मध्ये प्रकाशित केला, त्यात विठोबाअण्णांचे संक्षिप्त चरित्र आहे. कृष्णाजी नारायण आठल्ये हे कऱ्हाडजवळील टेंभूचे. त्यांचे शिक्षण कऱ्हाड येथील त्यावेळच्या नगरपरिषदेच्या ( पुढे शाळा नं. १ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या) शाळेत झाले. त्यावेळी आठल्ये यांचे वास्तव्य विठोबाअण्णांच्या कऱ्हाड येथील वाड्याच्या अगदी जवळ होते. विठोबाअण्णांच्या वाड्यातील श्रीरामाच्या भजनपूजनावेळी आठल्ये तेथे जात असत. विठोबाअण्णांचे सुपुत्र सीताराम ऊर्फ बापूसाहेब व रघुवीर ऊर्फ भाऊसाहेब यांच्याकडूनच विठोबाअण्णांच्या चरित्राविषयी माहिती आठल्ये यांना उपलब्ध झाली होती.

पंडित सातवळेकर संपादन करीत त्या 'पुरूषार्थ' मासिकाचा जून-जुलै १९६४ चा अंक सत्पुरुष विशेषांक म्हणून प्रसिध्द झाला होता. त्यात भीमाशंकर देशपांडे आळंदकर यांनी विठोबाअण्णांचे चरित्र दिले आहे. त्याचप्रमाणे 'कऱ्हाडचे संतकवी विठोबाअण्णा दप्तरदार' या शीर्षकाखाली रामचंद्र विष्णू कुलकर्णी (उंब्रजकर) यांनी सज्जनगड मासिक पत्रिकेच्या जून, जुलै व सप्टेंबर १९६६ च्या अंकांत विठोबाअण्णांचे गद्य-पद्य मिश्रित चरित्र दिले आहे. त्यातही बहुधा कृ. ना. आठल्ये यांनी लिहिलेल्या चरित्रातीलच घटना-प्रसंग थोड्याबहुत फरकाने आहेत.

विठोबाअण्णांचे शिष्य, सावंतवाडी येथील ह.भ.प. रघुनाथ रामकृष्ण भागवत यांनी विठोबाअण्णांची पदे मिळविली. ती बेळगाव येथील श्रीरामतत्त्व -प्रकाश छापखान्याचे मालक आबाजी रामचंद्र सावंत यांनी 'पदसंग्रह' नावाने पुस्तकरूपाने छापून प्रकाशात आणली. या पुस्तकाची चौथी आवृत्ती २७ नोव्हेंबर १९०५ रोजी निघाली. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर श्री विठोबाअण्णाकृत पदसंग्रह असे शीर्षक असले तरी या पुस्तकाच्या पृ.२ वर 'स्फुटकविता संग्रह' असे छापले आहे. पृ. ३ पासून पुढील सर्व विषम क्रमांकांच्या पृष्ठांवर 'स्फुटकवितासंग्रह' असे शीर्षक आहे.

दाते ग्रंथसूचीत विठोबाअण्णांच्या नावावर 'पदसमूह भाग २' (प्रकाशनवर्ष १९०१) या पुस्तकाची नोंद आहे. हे पुस्तक मी पाहिले होते. त्या पुस्तकात विठोबाअण्णांची ५१ मराठी व २१ संस्कृत अशी ७२ पदे होती, ती सर्व 'पदसंग्रह' या उपरोक्त पुस्तकात आहेत.

'पदरत्नमहोदधि' (संपादक दिनकर महादेव भागवत, इनामदार, धावडशी जि. सातारा) (प्रकाशनवर्ष शके १८१० म्हणजे इ.स. १८८९) या ग्रंथात अनेक कवींची पदे आहेत. विठोबा अण्णा दप्तरदारांची १७ पदे या ग्रंथात घेतली आहेत. ती 'पदसंग्रहा'तीलच आहेत.

ह.भ.प. ल. रा. पांगारकर संपादित 'भक्तिमार्गप्रदीप' मध्ये ईश्वरप्रार्थना या विभागात विठोबाअण्णांची चार पदे आहेत. त्यापैकी 'रत रे सख्या राघवनामी' या पदाखेरीजची तिन्ही पदे 'पदसंग्रहा'तील आहेत.

साताऱ्याचे गोविंद रामचंद्र माटे यांच्या संग्रहापैकी 'श्रीरामध्यानपरिपाठी' ही विठोबाअण्णा दप्तरदारांची काव्यकृती हस्तलिखित स्वरूपात होती. तिची प्रत करून कऱ्हाडचे पुरूषोत्तम पांडुरंग गोखले यांनी सातारा येथील 'समर्थ' साप्ताहिकाच्या एका (वर्ष उपलब्ध नाही.) दिवाळी अंकात प्रसिध्द केली होती. विठोबाअण्णांच्या 'पदसंग्रह' या मुद्रित पुस्तकात त्यापैकी केवळ ३६च श्लोक आहेत. पु. पां. गोखले यांना उपलब्ध झालेल्या हस्तलिखितात एकूण ५० श्लोक आहेत. प्रा. विश्वास हरी कुलकर्णी यांनी त्यांना श्री. उमाकांत र. कुर्लेकर यांच्याकडून उपलब्ध झालेली विठोबाअण्णांनी लिहिलेली २७ श्लोकांची 'श्रीरामगीत' ही काव्यकृती मला दिली. पदसंग्रहातील श्रीरामध्यानाला ओव्यांची चाल आहे. तर तोच आशय कुर्लेकरांकडून मिळालेल्या काव्यकृतीत 'हरिपाठाच्या अभंगां'च्या चालीवर व्यक्त झालेला दिसतो. उदा. 'पदसंग्रहा'तील ''शरयूतीरी अयोध्यानगर । तेथे कल्पवृक्षांचा बाग सुंदर । तयामाजी श्रीराममंदीर । हेमप्राकार चिंतावा ।।३।। या ओवीतील वर्णन 'श्रीरामगीतात' ''शरयूचे तीरी अयोध्यानगरी । भुक्ति मुक्ति चारी । वसती तेथे ।।१।। तयामाजी कल्पवृक्षांचे उद्यान । तेथे श्रीसदन राघोबाचे ।।२।।'' असे आढळते.

धुळे येथील राजवाडे संशोधन मंदिरातील 'मराठी हस्तलिखितांच्या' सूचीत कऱ्हाड काशीनाथ देव संग्रह (५१६/प/२२२) विठोबाअण्णांची आठ पदे अशी नोंद आढळते.

सातारा येथील माटे यांच्या राममंदिरात विठोबाअण्णांनी लिहिलेल्या ग्रंथांपैकी काही ग्रंथ होते. गोविंदराव रा. माटे यांनी ते कऱ्हाड नगरपालिकेच्या नगर वाचनालयाकडे सुपूर्द केले असा उल्लेख 'माटे कुलवृत्तान्ता'त (पृ.१३३) आहे.

विठोबाअण्णांच्या 'सुश्लोकलाघव' या ग्रंथाचे मराठी भाषांतर कृष्णाजी नारायण आठल्ये यांनी केले. हा ग्रंथ पुण्याचे ल.ना. गोडबोले यांनी १९१७ मध्ये छापून प्रकाशात आणला. त्याची दुसरी आवृत्ती त्यांनीच १९२२ मध्ये प्रकाशित केली. तथापि गेली अनेक वर्षे हा ग्रंथ दुर्मिळ झाला आहे.

विठोबाअण्णांच्या स्वलिखित ग्रंथांचा संग्रह त्यांच्या माघारी त्यांच्या नातीकडे ओझर्डे जि. सांगली येथील देशपांडे यांच्याकडे होता. १९४८ साली गांधीवधोत्तर झालेल्या जाळपोळीत देशपांड्यांचा वाडाही जाळण्यात आला होता. त्यात विठोबाअण्णांचे ग्रंथही

भस्मसात झाले. तथापि कोल्हापूर येथील एक थोर याज्ञिक, ज्योतिषमार्तंड बंडोपंत (मल्हारी विष्णू) धर्माधिकारी यांनी ओझर्डे येथील देशपांडे यांच्या घराच्या राखेच्या ढिगाऱ्यातून अर्धवट जळालेली पोथ्यांची पाने पोत्यात भरून आणली व रात्रंदिवस एक एक पान पाहून त्यांनी विठोबाअण्णांचा 'श्रीप्रयोगलाघव' ग्रंथ जुळविला. धर्माधिकारी यांनी आपला संग्रह कऱ्हाडच्या वेदशास्त्रसंवर्धन मंडळाकडे दिला आहे, त्यात 'प्रयोगलाघव' ग्रंथाची दोन प्रकरणे हस्तलिखित स्वरूपात पाहावयास मिळाली. बार्शी येथील सामवेदी चैतन्य नारायण काळे (श्री योगीराज वेदविज्ञान आश्रम) यांनी 'श्री प्रयोगलाघव' हा ग्रंथ छापून प्रकाशित केला आहे. 'गजेंद्रचम्पू' हे भारतचंपू, भागवतचंपू या धर्तीवर गजेंद्राच्या ध्यानावर विठोबाअण्णांनी लिहिलेले काव्य काव्येतिहाससंग्रहात प्रसिध्द झाले होते.

काळाच्या ओघात विस्मृतीत गेलेल्या एका संस्कृत मराठी पंडित कवीस, ज्येष्ठ नि श्रेष्ठ कीर्तनकारास, हिंदू धर्माचा जाज्वल्य अभिमान बाळगणाऱ्या व्यासंगी व्युत्पन्न विद्वानास, त्याच्या द्विशतसांवत्सरिक जयंतीनिमित्ताने त्यांच्या चरित्राची, कर्तृत्वाची आणि कवित्वाची ओळख नव्या पिढीला करून देण्यासाठी विठोबाअण्णांची ही वाङ्मयी पूजा बांधली आहे.

या पूजेच्या सिध्दतेसाठी प्रा. का. धों. देशपांडे, डॉ. म. बा. जोशी, डॉ. विनायक गरूड, पं. हरिभाऊ घळसासी, मुकुंद कंटक, श्यामराव घळसासी, बाळासाहेब ठाकूर, प्रा.विश्वास कुलकर्णी, अमित काळे, मोरेश्वर कुंटे (पुणे), गजानन रामचंद्र बेंद्रे (कोल्हापूर) आर. जी. देशपांडे (राज डी.टी.पी.), श्रीधर कुलकर्णी व विद्याधर कुलकर्णी (श्रीधर मुद्रणालय), गजानन रामचंद्र बेंद्रे (कोल्हापूर), धनंजय कुलकर्णी, सौ. माधवी (प्रेमा) वसंत कुलकर्णी, वेदविद्या संवर्धन मंडळ कऱ्हाड, छ. प्रतापसिंह (थोरले) नगरवाचनालय, सातारा, मुंबई मराठी साहित्य संघ इ. व्यक्ती, संस्था यांचे सहकार्य लाभले याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

**विद्याधर पुरुषोत्तम गोखले**

# विठोबाअण्णा दप्तरदार

## पूर्वपीठिका

कोण होते विठोबाअण्णा दप्तरदार ? खरं म्हणजे दप्तरदार हे काही त्यांचं आडनाव नव्हे. त्यांचं आडनाव होतं, बेंदरे. गुलबर्ग्याजवळ बेदर गावचे म्हणून यांचं आडनाव बेंदरे. हे शांडिल्य गोत्री देशस्थ ब्राह्मण. त्यांच्यापैकी बाळाजीपंत नावाचे गृहस्थ पुण्याला जाऊन माधवराव पेशवे (कारकीर्द १७६१ ते १७७२) यांच्याकडे काही उद्योग-चाकरी मिळावी म्हणून भेटले. पेशव्यांनी कऱ्हाडची दप्तरदारी त्यांच्याकडे सोपविली. फडणीसानं तयार केलेल्या रोजकीर्दीवरून हिशोब जमवून, व्यवस्थित लिहून दरमहा संक्षेपाने हुजूरास (वरिष्ठांकडे) पाठविण्याचे काम करणारा अधिकारी म्हणजे दप्तरदार. बाळाजीपंत बेंदरे कऱ्हाडची दप्तरदारी वंशपरंपरेने पाहू लागले. त्यांचे बेंदरे हे आडनाव मागे पडले आणि 'दप्तरदार' हेच त्यांचे आडनाव म्हणून रूढ झाले.

## जन्म, बालपण, शिक्षण

बाळाजीपंत दप्तरदारांना महादजी आणि त्र्यंबक असे दोन मुलगे. बाळाजीपंतांच्या निधनानंतर महादजी वयाच्या पंधराव्या वर्षापासून दप्तरदारीची कामे पाहू लागले. महादजींना लोक 'तात्या' म्हणून हाक मारीत. ते मोठे सुशील व धर्मनिष्ठ होते. त्यांच्या पत्नीचे नाव वाराणशी उर्फ गीताबाई. त्यांना अनेक मुले झाली, पण दुर्दैवाने ती फार काळ जगू शकली नाहीत. त्यांचा रामचंद्र नावाचा एक मुलगा तर दप्तरदारीच्या कामी वडिलांना मदत करू लागलेला, पण तोही त्याच्या वयाच्या पंधराव्या वर्षीच आकस्मिकपणे निधन पावला. यांचाच एक मुलगा म्हणजे विठ्ठल. मोठ्या नवसासायासानं झालेला आणि जगला वाचलेला. तोही पौषातील अमावस्येला जन्मलेला. ( पौष वद्य अमावस्या शके १७३५ म्हणजेच.. जानेवारी १८१४) अर्थातच त्याला लाडाकोडात वाढविलेले. त्यामुळे विठ्ठल हट्टी, हेकेखोर आणि हूड झाला. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत तो शाळेतही जात नव्हता.

त्यावेळी पंतप्रतिनिधींची राजधानी कऱ्हाडास होती. पंतांच्या कोटात एका दसऱ्याच्या दरबारावेळी महादजी तात्यांबरोबर विठ्ठलही गेला होता. सुभेदार बाबाजीराव लिमये यांनी विठ्ठलाची 'काय करतोस? किती शिकलास?' चौकशी केली. दहा वर्षांचा असूनही हा मुलगा शाळेत जात नाही हे समजल्यावर सुभेदारांनी त्याची चांगलीच कानउघाडणी केली.

विठ्ठलाच्या मनाला ही गोष्ट बरीच लागली असावी. कारण दुसऱ्याच दिवसापासून तो आपण होऊनच घराजवळच असलेल्या देशपांडे यांच्या वाड्यातील शाळेत जाऊ लागला. तो जात्याच हुशार असावा. अल्पावधीतच बाळबोध व मोडी लेखन, वाचन, गुणाकार, भागाकार, व्याजाचे हिशोब त्याने आत्मसात केले. त्याच्या वळणदार मोडी अक्षराचा कित्ता इतरांनी गिरवावा असे पंतोजी बाकीच्या मुलांना मोठ्या कौतुकाने सांगत. त्याची प्रगती सुभेदार लिमये यांना समजल्यावर तेही खूष झाले.

कऱ्हाडातील रामशास्त्री सोनटक्के यांच्या घरी अप्पाशास्त्री नावाचे पुराणिक राहत. विठ्ठल त्यांच्याकडे संस्कृत शिकावयास जाई. त्यावेळी छापील पुस्तके नसत. विठ्ठलाने आप्पा पुराणिकांकडील रूपावली, समाजचक्र इ. प्रकरणे स्वतःच्या वळणदार मोडी लिपीत लिहून घेतली. आपला मुलगा आप्पाशास्त्रीकडे संस्कृत शिकतो हे विठ्ठलाच्या वडिलांना माहिती नव्हते. अप्पाशास्त्री दर गुरूवारी आणि एकादशीस दप्तरदारांच्या घरी पुराण सांगण्यास येत. एके दिवशी पुराण सांगता सांगता अप्पाशास्त्री मध्येच थांबले व 'यापुढील दहा-वीस श्लोक हा विठ्ठल सांगेल' असे त्यांनी सांगितले. कुशाग्र बुध्दीच्या विठ्ठलाने त्या दिवशीचे उरलेले पुराण असे सांगितले की श्रोतेच काय, अप्पाशास्त्रीही ते ऐकून संतुष्ट झाले. महादजींनाही आनंद झाला व महादजी तात्यांनी अप्पाशास्त्रींची राहण्याची सोय स्वतःच्या घरी केली. या अप्पाशास्त्रींच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठलाने रूपावली, समासचक्र, व्युत्पत्तिशास्त्र, रघुवंश, कुमारसंभव, किरातार्जुनीय, शिशुपालवध व नैषधचरित्र ही पंचमहाकाव्ये इ. संस्कृत विषयाचे जिज्ञासापूर्वक अध्ययन केले. आता आपल्याजवळ या शिष्याला शिकवता येण्याजोगे काही नाही अशी जाणीव होऊन अप्पाशास्त्री एका पहाटे कोणालाही न सांगता घर सोडून गेले. या अप्पाशास्त्रींनीच विठ्ठलाला 'अण्णा' म्हणावयास सुरूवात केली. त्यामुळे इतर लोकही त्याला 'विठोबाअण्णा' असे म्हणू लागले होते.

आप्पाशास्त्री निघून गेल्यामुळे विठोबाअण्णांचा व्याकरणाचा अभ्यास तसाच राहिला. पुढे त्यांनी गुंडाचार्य घळसासी आणि नारायणाचार्य गजेंद्रगडकर यांच्याशी त्यांनी व्याकरणाचा अभ्यास केला. व्यंकट जांभळे ( भिक्षुक) यांच्या वैद्यकशास्त्रातील शंका समाधानासाठी विठोबाअण्णांनी भाऊ टोणपे मालखेडकर यांच्याकडे वैद्यकीचा देखील अभ्यास केला. तसेच भिकशास्त्री पाध्ये यांच्याकडून कौमुदीचा उत्तरार्ध, उपनिषदे, शांकरभाष्य, श्रीमद्‌भगवदगीता ही प्रस्थानत्रयी शिकून घेतली. कऱ्हाडातील बहिरोबा गल्लीत सखाराम यशवंत सप्रे यांचे केशवेश्वराचे देऊळ आहे. या देवळातच भिकूशास्त्री

पाध्ये शिकवत असत. केशवेश्वराच्या देवळात बऱ्याचवेळा संन्यासी वस्तीला असत. एकदा या देवळात भिकुशास्त्री यांच्याकडे आले असताना विठोबा अण्णांच्या कानावर गाण्याची लकेर आली. चौकशी केल्यावर गोविंदस्वामी नावाचे संन्यासी गात असल्याचे कळाले. आपल्याला कीर्तनासाठी गोविंदस्वामींनी संगीत शिकवावे अशी विठोबाअण्णांनी त्यांना गळ घातली. संन्याशास संगीत वर्ज्य या कल्पनेमुळे गोविंदस्वामींनी मंदिरातच रात्रीच्या वेळेसच फक्त विठोबाअण्णांना संगीताची दीक्षा दिली.

❀❀❀

तत्कालीन रिवाजाप्रमाणे विठोबाअण्णा बारा वर्षांचे असतानाच त्यांचा विवाह झाला होता. (इ.स.१८२६) सदाशिवगड येथील चिमणाजी विरमाडकर यांची कन्या गया ही विठोबाअण्णांची पत्नी. त्यांना सीताराम ऊर्फ बापू, रघुवीर ऊर्फ भाऊ असे दोन मुलगे आणि भवानीबाई ही त्यांची मुलगी. विठोबा अण्णांना अग्निहोत्र घेण्याची फार इच्छा होती. पण इ.स.१८४३ मध्ये पत्नीचे देहावसान झाल्यामुळे त्यांची ती इच्छा अपुरीच राहिली. त्यांनी दुसरा विवाह केला नाही. पत्नीच्या निधनानंतर विठोबाअण्णांनी पागोटे घालणे सोडून दिले. ते स्वतःच्या डोक्यास शालजोडी बांधत. तथापि अशा कामात ते फारसे रमले नाहीत.

वडिलांचे निधन झाले. (१८४२) त्यावेळी विठोबाअण्णा सत्तावीस वर्षांचे होते. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर दप्तरदारी संपुष्टात आली होती. त्यांनी सातारा छत्रपतींकडे काही काळ दुय्यम कारकून म्हणूनही काम पाहिले. पण १८४९ मध्ये साताऱ्याची शिवछत्रपतींची गादी खालसा केल्यानंतर विठोबाअण्णांनी औंध संस्थानात मुन्सफ म्हणून काम पाहिले.

'प्रयोगलाघव', 'सुश्लोकलाघव', या ग्रंथांच्या अखेरीस 'ब्रह्मण्याग्रगण्यपदव्यारुढ श्रीनिवास पंडित प्रतिनिधी' यांच्या उदार आश्रयाचा विठोबाअण्णांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे.

❀❀❀

### वीर मारूती

नदीकाठी असणाऱ्या गावातील तरूणांना पोहण्याचा छंद आपोआप लागतोच. कऱ्हाडात कुस्तीची परंपराही फार जुनी. वाळवंटात कुस्त्या कराव्यात, नदीत डुंबावे हा छंद तरूण विठोबाअण्णांनाही होता. या छंदामुळेच एकत्र आलेल्या राघोपंत आपटे,

विठोबाअण्णा, नारायण रामचंद्र कुर्लेकर, हरिभट बापूभट वळवडे इत्यादी तरूणांनी सैदापूरच्या वाळवंटात वीर मारूतीचे भव्य, अष्टकोनी, चिरेबंदी मंदिर बांधले ( इ.स. १८३८) ते एवढे भक्कम की गेली पावणेदोनशे वर्षे कृष्णेला आलेल्या महापुरांना तोंड देत खंबीरपणे आजही उभे आहे.

त्यावेळी कृष्णेचा प्रवाह कऱ्हाडातील घाटांना घासून वाहत असे. १८६३ च्या सुमारास झालेल्या खोडशीच्या धरणामुळे कृष्णेचा प्रवाह सैदापूरकडे सरकला व नदीचे पात्र आणि घाट यामध्ये वाळवंट झाले. नदीच्या प्रवाहातील बदलामुळे कृष्णेच्या दक्षिणेकडील वीर मारूतीचे मंदिर कऱ्हाडच्या बाजूस झाले. येथे हिंदूची स्मशानभूमी असल्यामुळे तो वीर मारूती 'मढ्या मारूती' म्हणून ओळखला जाऊ लागला होता. अलीकडे टेंभू योजनेमुळे पाणी अडवले जात असल्यामुळे हे मंदिर आता पात्रात गेले आहे.

❀❀❀

**मंत्रोपदेश**

इ. स. १८४५ मध्ये विठोबाअण्णांनी आबामहाराज यांजपाशी वेदशास्त्रांचा अभ्यास केला आणि अमृतराय या सत्पुरुषापासून मंत्रोपदेश घेतला असा कृ. ना. आठल्ये यांनी 'सुश्लोकलाघव' ग्रंथास जोडलेल्या चरित्रात उल्लेख आहे. 'पदसंग्रह' या पुस्तकात प्रारंभी दिलेल्या चरित्रात कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी महाराज 'राजगुरू बाबामहाराज यांचे वडील चिरंजीव आबा महाराज यांचेजवळ त्यांनी वेदान्तशास्त्राचा अभ्यास करून त्याजपासून मंत्रोपदेशही घेतला.' असे म्हटले आहे.

'सुश्लोकलाघव' या विठोबाअण्णांच्या ग्रंथात ज्ञानानंद (श्लोक ३६२), अमृतराय (श्लोक ३६०, ३६१, ३६२), सिध्दराज (श्लोक ३६२), रामचंद्र पंडित ( श्लोक ३६३, ३६४, ३६५) असे गुरू, परात्पर गुरू संदर्भात स्वतःच निर्देश केले आहेत. अमृतराय यांचा काळ १६९८ ते १७५३ असा आहे. तर विठोबाअण्णांचा काळ १८१४ ते १८७३ असा आहे. त्यामुळे अमृतरायांकडून विठोबाअण्णांनी मंत्रोपदेश घेतला, हे कृ. ना. आठल्ये यांचे विधान कालविपर्यस्त ठरते.

भारतीय संस्कृतिकोशाच्या (संपा. पं. महादेवशास्त्री जोशी) खंड १० (आ. २ जानेवारी १९९५) पृष्ठ ४३ वर सिध्देश्वरमहाराजांची माहिती आहे, ती अशी -

सिद्‌धेश्वर महाराज मूळचे मराठवाड्यातील सिद्‌धेश्वर रामचंद्र देव. (१७३३-

१८०१). त्यांनी अमृतराय यांच्याकडून दीक्षा घेतली. सिध्देश्वर महाराज आपल्या गुरूंच्या आज्ञेवरून काशी येथे अद्वैतानंद ( अमृतरायांचे गुरूबंधू) यांच्याजवळ राहत. अद्वैतानंदांच्या समाधीनंतर सिध्देश्वरमहाराज तीर्थयात्रा करीत कृष्णाकाठी कोळे-नरसिंहपूर येथे आले. पेशव्यांचे सावकार श्रीमंत कावरस यांनी त्यांच्यासाठी वाडा बांधून दिला. सिद्धेश्वरमहाराजांच्या निर्वाणानंतर त्यांच्याविषयी प्रेमादर बाळगणाऱ्या कोल्हापूरच्या छत्रपती शिवाजी महाराजांनी दहनस्थळी समाधी बांधली. या सिद्धेश्वर महाराजांचे सुपुत्र श्री रामचंद्र हेही संस्कृत पंडित व आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी. सिद्धेश्वरमहाराजांचे वंशज बाबा महाराज आबा महाराज हेही तपस्वी साक्षात्कारी पुरूष होते. आबामहाराज यांच्याकडून विठोबाअण्णांनी मंत्रदीक्षा घेतली. त्यामुळे विठोबाअण्णांची गुरूपरंपरा पुढीलप्रमाणे :

श्रीविष्णू- ब्रह्मदेव- सनकादिक- नारदमुनी- वेदव्यास- शुक्राचार्य- पूर्णानंदस्वामी- ज्ञानानंद - अमृतराय- सिद्धेश्वर - रामचंद्र - बाबामहाराज- आबामहाराज

❀❀❀

**कीर्तन**

भगवंतराव पंतप्रतिनिधींच्या पत्नी राजसबाई यांनी इ.स.१८३० च्या दरम्यान कऱ्हाडात घाटावर श्री कृष्णाबाईचे मंदिर बांधले. तेथे चैत्र पौर्णिमेपासून चार दिवस उत्सव साजरा होत असतो. पंतप्रतिनिधींनी आपली राजधानी औंधास हलविली तोपर्यंत उत्सव बहुधा प्रतिनिधीमार्फत होत असावा. १८५३ मध्ये कृष्णाबाईचा रथ कृष्णेच्या महापुरात वाहून गेला, त्या दरम्यान केव्हातरी विठोबाअण्णांचे मित्र वामनाचार्य टोणपे यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांच्या वतीने श्री कृष्णाबाईचा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली असावी. १८६५ च्या दरम्यान बलोपासना करणाऱ्या तरूण मंडळींनी प्रतिवर्षी हनुमान जयंती साजरी करण्यासाठी मारूती उपासक मंडळाची स्थापना केली. या दोन्ही उत्सवांत विठोबाअण्णांचा उत्साही सहभाग होताच, पण या निमित्ताने कीर्तन करावयाचे ठरल्यानंतर विठोबाअण्णांनी स्वत:च कीर्तनेही केली. त्यांच्या कीर्तनात अप्पा परशुराम आपटे, गोविंदबुवा कुरवलीकर, शंकरअण्णा यांची साथ असे. दशाहाराच्या काळात (म्हणजे ज्येष्ठ शुध्द प्रतिपदा ते ज्येष्ठ शुध्द दशमी ) सप्रे यांच्या घरी श्री कृष्णाबाईचा उत्सव असे, त्यातही विठोबाअण्णा कीर्तने करीत.

❀❀❀

कीर्तनकार कसा असावा याचे वर्णन कऱ्हाडचेच कीर्तनकेसरी ह.भ.प. नरहरबुवा कऱ्हाडकर यांनी केले आहे. ते म्हणत,

''संगीताग्रणि संस्कृतज्ञ असुनी संभाषणी जो पुरा ।
वक्ता होऊनि कंठमाधुरि बरी बोले रसाला गिरा ।।
प्रासंगोचित भाषणा करितसे भोगी वपू सुंदरा ।
होई हा हरिदास हा हरिगुणे जो कीर्तनीह हिरा ।।''

हे वर्णन ( मौज दिवाळी अंक १९७२) कऱ्हाडातील आद्य कीर्तनकार विठोबाअण्णा दप्तरदार यांना तंतोतंत लागू पडते. ''जीवाशिवाच्या संबंधात शिवासंबंधी जीवाचे कर्तव्य सांगणारा पूर्वरंग आणि 'सगुणचरित्रे परमपवित्रे सादर वर्णणारे' आख्यान ही कीर्तनाची दोन्ही अंगे विठोबाअण्णा दप्तरदारांच्या खानदानी वाङ्मयाने बहरली.'' (साहित्यिक कऱ्हाड, पृ.२१) असे बाबुराव गोखले यांनी म्हटले आहे तर संतचरित्रकार ज. र. आजगावकर लिहितात,' विठोबाअण्णांनी कीर्तनातील रंगदेवतेने मुमुक्षुजनांच्या जीवनात, नयनात प्रेमाश्रू आणले. कवित्वशक्तीने रसिकजनांना आनंदभरात डोलावयास लावले आणि शेवटी एकनिष्ठ भक्तीने भगवंताला वश करून घेतले.''

आपले कीर्तन रंगावे यासाठी विठोबाअण्णा चातुर्मासात प्रात:काळी स्नान करून अध्यात्मरामायणाचा पाठ करीत असत.

❀❀❀

**शीघ्रकवित्व**

विठोबाअण्णा पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांवर विश्वास ठेवणारे. दोनशे वर्षांपूर्वी आपणच कर्नाटकातले 'पुरंदर विठ्ठल' या नावाचे कानडी कवी होतो असे ते स्वत: सांगत. कऱ्हाडात एकदा एक कानडी माणूस ताडपत्रावर लिहिलले पुरंदर विठ्ठलाचे ग्रंथ विक्रीसाठी घेऊन आला होता. 'याच माझ्या पूर्वजन्मीच्या कविता, म्हणून विठोबाअण्णांनी ते सर्व ग्रंथ विकतही घेतले होते.

पुरंदरदास ( इ.स. १५६४) हा माध्वसांप्रदायी. याच्या पदांतून विष्णुस्तुती आढळते. याने आपले आयुष्य विठ्ठलनामसंकीर्तनात घालविले. कानडी लोकांत त्याची पदे प्रिय असून त्याला 'कर्नाटकचा तुकाराम' म्हणत.

विठोबाअण्णा पूर्वजन्मापासून कवी असोत वा नसोत, त्यांना शीघ्रकवित्वाची दैवी देणगी होती एवढे निश्चित. औंधास असताना तेथील विनायकराव बाबुराव बापट यानी

सांगितलेल्या एका गद्य मजकुराचे अर्थहानी न होता पद्यात रूपांतर विठोबाअण्णांनी त्याच बैठकीत करून दाखविले होते.

वाटेगाव ( जि. सांगली) येथे दिवेकरांचे वासुदेवाचे मंदिर आहे. तेथे विठोबाअण्णांचे कीर्तन होते. त्यांच्या काळातील एक ज्येष्ठ कीर्तनकार बाबा जोशी म्हणून होते, ते विठोबाअण्णांच्या कीर्तनावेळी श्रोते म्हणून बसले होते. अण्णांनी त्यांना पाहिले आणि त्या दिवशी ध्रुवाचे आख्यान लावण्याचे योजिले. ध्रुवाने तपश्चर्या केल्यावर देवाने त्याला आपले चतुर्भुज रूप दाखविले ते 'आनंदाचा कंद' या पदात विठोबाअण्णांनी असे उभे केले की बाबा जोशींसह सर्व श्रोते आनंदाने डोलू लागले असे सांगतात. वाटेगावच्या मंदिरातील वासुदेवाची मूर्ती पाहून त्यांना ती सुचली म्हणतात. दोनशे वर्षापूर्वी वासुदेवबुवा यांनी भागवतातील वर्णनाप्रमाणे वासुदेवाची पंचधातुची निळसर झाक येईल अशी मूर्ती बनवून घेतली होती. या पदात 'उभा पुढे भक्त सखा- गोविंद' असा धृपदात उल्लेख आहे. तो वाटेगावच्या गोविंदबुवांचा. ते तेथील साक्षात्कारी सत्पुरूष होते.

❀❀❀

## याज्ञिकीत प्राविण्य

श्रौतस्मार्त यज्ञ कर्मविधीतील अधिकारी व्यक्ती असा विठोबाअण्णांचा लौकिक होता. कऱ्हाडातील काळा मारूती मंदिर ज्यांनी बांधून घेतले ते प्रकांड पंडित बाबा काळे यांच्याकडे झालेल्या एका यज्ञप्रसंगी चंदावरकर दीक्षित, गजेंद्रगडकर यांच्याशिवाय काशीतूनही काही विद्वान पंडित आलेले होते. विठोबाअण्णांनी त्या पंडितांनी केलेली यज्ञकुंडे शास्त्रोक्त नाहीत हे त्यांना साधार समजावून सांगितले. ते त्यांनाही पटले. त्यामुळेच तेव्हापासून काशीत कोणताही याग असो, विठोबाअण्णांना पाचारण केले जाई. त्यानंतर कऱ्हाडात इ. स. १८६३ मध्ये शिदुभाऊ गरूड यांच्याकडे दुसरा याग झाला, त्याची प्रमुख धुरा अर्थातच विठोबाअण्णांकडेच होती. याज्ञिकीमधील अध्ययन अनुभवांमुळेच विठोबाअण्णांचा 'प्रयोगलाघव' हा याज्ञिकीसंदर्भातील ग्रंथ शेवटचा शब्द मानला जातो.

❀❀❀

विठोबाअण्णांनी आपले गुरू आप्पाशास्त्री यांची पाठशाळा काही दिवस स्वत: चालविली. वाई येथील नागेश विनायक बापट (मृ.१९०२) हे मराठी ऐतिहासिक कादंबरीकार होते. त्यांनी विठोबाअण्णांकडे संस्कृतचे शिक्षण घेतले, (सुलभ विश्वकोष पृ. १६७२) अशी नोंद आढळते.

**पुनर्विवाहाचा वाद**

इ.स. १८६५ मध्ये काही समाजसुधारकांनी विधवा विवाहोत्तेजक मंडळ स्थापन केले होते. त्याला उत्तर म्हणून सनातन हिंदुधर्माच्या अभिमान्यांनी 'हिंदूधर्मव्यवस्थापक सभा' या नावाची संस्था काढून वादासाठी आव्हान दिलं होते. विष्णुशास्त्री पंडितांनी 'इंदुप्रकाश' पत्रातून विवाहास तयार असलेल्या विधवेची जाहिरातच प्रसिध्द केली. तेव्हा रूढीच्या पुरस्कर्त्यांनी फौजदारी खटले, दमबाजी हे प्रयोगही केले. पण १५ जून १८६९ रोजी तो विधवा विवाह झालाही. हिंदुधर्मव्यवस्थापकांनी त्या विवाहाशी संबंधित सर्वांवर बहिष्कार घालण्याचे फर्मानच काढले. तेव्हा असा बहिष्कार घालणे अयोग्य अशा आशयाचे जाहीरनामे विष्णुशास्त्री पंडितांनी गावोगाव लावले होते. कऱ्हाडातही तसा जाहीरनामा लागलेला पाहून विठोबाअण्णांनी विष्णुशास्त्री पंडितांशी वाद घालण्याचे आव्हान स्वीकारले. सनातन हिंदू धर्माचा जाज्वल्य अभिमान असणाऱ्या विठोबाअण्णांजवळ विद्वत्ता आणि व्यासंग होताच. अमोघ वक्तृत्वाच्या दैवी देणगीबरोबरच अंगीकृत कार्य पार पाडण्यासाठी लागणारी जिद्द, कष्टाची तयारी त्यांच्याकडे होतीच. त्यात शंकराचार्यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. विठोबाअण्णांना अष्टे (जि. सांगली) येथील रावसो गोविंदराव धोंडो लिमये वकील यांच्याकडे शास्त्र ग्रंथ पोथ्या असल्याचे कळाल्यावर त्यांच्याकडे दोन महिने ठिय्या देऊन त्यांनी शास्त्रग्रंथांतील आधाराची टिपणे केली. मग वाई, पुणे, मुंबई इ. महत्त्वाच्या शहरी विठोबा अण्णा आणि विष्णुशास्त्री पंडित यांची परस्परांवर मात करण्यासाठी युक्तिवादाची भाषणे झडू लागली. अखेर निर्णायक वाद इ. स. १८७० मध्ये शंकराचार्यांसमोर उभा राहिला. वादी होते विष्णुशास्त्री पंडित तर प्रतिवादी म्हणून विठोबाअण्णांचे गुरू नारायणाचार्य गजेंद्रगडकर होते. ग्वाल्हेर येथून गोपाळाचार्य घळसासी, कऱ्हाडकर यांना मुद्दाम बोलाविले होते.

नऊ दिवस चाललेल्या या वादाच्या धुमश्चक्रीत सनातनी पक्षाच्या नारायणाचार्य गजेंद्रगडकरांना शास्त्रग्रंथातील महत्त्वपूर्ण संदर्भाची रसद पुरविण्याचे काम विठोबाअण्णा निष्ठापूर्वक करीत होते. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा संस्मरणीय प्रसंग आहे.

या निमित्ताने झालेल्या अभ्यासाचा उपयोग करून विठोबाअण्णानी 'पुनर्विवाह शास्त्रसंमत नाही' असे प्रतिपादन करणारा 'विवाहतत्त्व' हा ग्रंथ तयार केला. जवळ जवळ वर्षभर चाललेल्या या उद्योगात विठोबाअण्णांना सुमारे दीड हजार रूपये कर्ज मात्र झाले. पण वादाचा निर्णय सनातनी पक्षाच्या बाजूने झाला. यानंतर पुणे, मुंबई, कोल्हापूर,

जमखंडी, कुरूंदवाड, इचलकरंजी इ. ठिकाणी विठोबाअण्णांनी कीर्तन- प्रवचन-पुराणांद्वारे आपल्या रसवंतीने बहार उडवून दिली.आणि श्रोत्यांनीही मन:पूर्वक दाद देऊन उचित संभावना देऊन विठोबा अण्णांना कर्जमुक्तही केले.

❀❀❀

रघुवीर आणि सीताराम या विठोबाअण्णांच्या दोन्ही पुत्रांनी 'विधवाविवाहखंडनाचा साद्यन्त इतिहास' याच नावाची वेगवेगळी दोन पुस्तके १८६९-१८७० मध्ये लिहिली असल्याची नोंद 'दातेग्रंथसूची' (खंड १) मध्ये आढळते.

❀❀❀

**चित्रकला**

विठोबाअण्णांना चित्रकलेची उत्तम जाण होती. ते स्वत: चित्रे काढीत तसेच मातीच्या सुबक मूर्तीही ते बनवत. या क्षेत्रातील त्यांच्या अभ्यासाबद्दल स्वत: कलाकार आणि मर्मज्ञ रसिक असणाऱ्या औंधचे श्रीमंत भवानराव श्रीनिवास ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी आपल्या १९४६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'आत्मवृत्त' (खंड एक) या ग्रंथात केलेले वर्णन बोलके आहे. ते म्हणतात, ' विठोबाअण्णा कऱ्हाडकर त्यावेळी औंधास आमच्या वडिलांच्या पदरी मुन्सफ होते. (१८७२ च्या सुमारास) त्यांनी ( टेंभूच्या) भिवा सुताराला श्रीरामपट्टाभिषेकाची पूर्ण कल्पना देऊन श्रीरामरक्षेतील 'ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुष्यं' या ध्यानाबरहुकूम असे चित्र कसे काढावे, या ध्यानातही काय फरक करावा ही कल्पना आणून दिली होती. ( त्यामुळे) भिवा सुताराचे रामपंचायतन म्हणजे एक रत्न आहे. देवाच्या चित्राने शांतरस उत्पन्न होऊन आत्मा तल्लीन होऊन जावा हे कार्य ही तसबीर पूर्णत्वाने करीत आहे. श्रीरामाच्या पीतांबराच्या घड्या पाहून प्रत्यक्ष वस्त्रच नेसवल्याचा भास होतो. मारूतीच्या अंगावरील केस आता हाताला लागतील असे वाटते. मारूतीची हात जोडून नम्रतेने उभे राहण्याची ढब, शेपूट, एकाग्र दृष्टी, माणसाला तन्मय करून सोडते. रामाच्या ज्ञानमुद्रेचा उताणा हात इतका कोमल आहे की आता त्यातून रक्त सांडते आहे असे वाटते. 'नवपल्लव-कोमल-हाते, उचलुनिया शिवचापाते' या विठोबा-अण्णांच्या ओळींची आठवण होते. शिवाय चारही भावांमध्ये कुटुंबसादृश्य आहे, तरीही रामाचा, भरताचा, चेहरे निरनिराळे, लक्ष्मण-शत्रुघ्नांचे चेहरे चिराळे असूनही ते आवळेजावळे वाटावेत असे रूपसादृश्यही आहे. मुकुटातील, गळ्यातील रत्ने, मोती आता हाताने उचलून घ्यावेत इतके सुंदर. रंगाचा ताजवा (colour combination) व

हातापायाच्या वळणाचा तोल ( balance ) उत्कृष्ट आहे. (१९४६ मध्ये ) पंचाहत्तर वर्षे झाली तरी नवे वाटावे असे रंग वापरले आहेत.'

स्वत: उत्तम कलाकार व मूर्तिकार असलेला भिवा सुतार विठोबाअण्णांना गुरूस्थानी मानत असे. त्याने कृतज्ञताबुध्दीने लाकडाची एक सुंदर वासुदेव मूर्ती करून रंगवून विठोबाअण्णांना दिली होती. 'भिवा सुताराने विठोबाअण्णांना दिलेली वासुदेवाची मूर्ती पुष्कळ दिवस विठोबाअण्णांजवळ व त्यांच्या सीताराम-रघुवीर या मुलांपाशी होती. त्यांचा नातू पांडुरंग याजपाशी मात्र ती मूर्ती नव्हती. आता त्यांच्या मुलापाशीही नाहीच. ती सीतारामपंताच्या मुलीने -यमूने- आपल्या सासरी नेली म्हणतात. जुन्या कारागिरीचे उत्तम काम म्हणून आम्ही हजार रूपये द्यावयास कबूल झालो, पण यमूच्या सासरच्या माणसांनी दाद लागू दिली नाही.' ( आत्मवृत्त खंड १ पृ. ५१७-५१८) अशी खंत बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.

औंध येथे असताना राजाराम रंगोबा या पुण्याच्या छायाचित्रकारांकडून इतरांप्रमाणेच विठोबाअण्णांनी स्वत:चे छायाचित्र काढून घेतले असा उल्लेख बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या 'आत्मवृत्ता'त ( पृ. ५१३ वर ) आहे. 'त्यांचे फोटोग्राफ आमच्या संग्रहात आहेत.' असेही महाराजांनी लिहिले आहे.

❀❀❀

## सहज खुंटले बोलणे

एका वर्षी काळे यांच्या घरी भागवत सप्ताह चालू असताना विठोबाअण्णांना पक्षाघाताचा झटका आला. रामनामाचा उच्चार कसाबसा करता येई. त्यांना स्वत:ला वैद्यकशास्त्राचे ज्ञान उत्तम असल्यामुळे औषधोपचाराने ते लवकरच बरे झाले. १८६८ नंतर त्यांना पुन्हा एकदा अर्धांगवायुचा झटका आला. औंधचे सुप्रसिध्द वैद्य बाळशास्त्री बापट यांच्या उपचाराने त्यांना बरे वाटू लागले.

विठोबाअण्णा इ.स. १८५९ पासून प्रतिवर्षी आपल्या घरी रामनवमीचा उत्सव साजरा करीत. इ. स. १८७३ त्या वर्षीही नवमीचा उत्सव मोठ्या उत्साहाने झाला. या उत्सवासाठी पुष्कळ मंडळी आली होती.

याचवेळी इंदूरहून सुभेदार गणेश सीताराम गोळवलकर हे कऱ्हाडास विठोबाअण्णांकडे मुद्दाम आले होते. विलायतेस जाऊन आल्यामुळे शुध्द होण्यासाठी विठोबाअण्णांनी त्यांना शास्त्रार्थ सांगितला. सांगलीच्या पाच घनपाठी वैदिकांना घेऊन मुहूर्तही काढून दिला.

गोळवलकरांनी संतुष्ट होऊन विठोबाअण्णांना शंभर रूपयांची घसघशीत दक्षिणाही दिली.

त्यानंतर पंधरा दिवसांतच चैत्र वद्य दशमीस विठोबाअण्णांच्या पाठीत अचानक कळा मारू लागल्या. विठोबाअण्णांचे परमस्नेही विष्णुपंत भागवत जवळच बहिरोबा गल्लीतील उत्तरालक्ष्मी मंदिरासमोर राहात. त्यांना विठोबाअण्णांनी बोलावून घेतले. 'माझा आता भरवंसा नाही. मुलानी नोकरी करू नये. आपल्यामागे रामनवमीचा उत्सव चालू राहावा' अशा निरवानिरवीच्या गोष्टी त्यांनी विष्णुपंत भागवतांजवळ केल्या. विष्णुपंत भागवत म्हणजे सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकरांचे आजोबा- आईचे वडील.

चैत्र वद्य एकादशीस विठोबाअण्णा नेहमीप्रमाणे प्रात:काळी उठले. ब्राह्ममुहूर्तावर (पहाटे) उठून श्रीरामाचे ध्यान करण्याचा विठोबाअण्णांचा परिपाठ होता. (पदसंग्रह पृ.३) नामध्यानशतकातील ( पदसंग्रह पृ.२९) नामावलीने तुळशीपत्र वाहून विठोबाअण्णा श्री कोदंडरामाची नित्य पूजा करीत. त्याप्रमाणे त्यांनी श्रीरामध्यान, संध्या, देवपूजा केली. श्रीरामास खारकेच्या खिरीचा नेवैद्य दाखविला. 'श्रीरंगा, दे मजला सत्संगा', 'उत्तम जन्मा येऊनी रामा गेलो मी वाया', 'अहं शैशवे' ( अपराधस्तोत्र) इ. पदे नेहमीप्रमाणे म्हटली. हातात पंचपात्री घेऊन पळीने तीर्थ व तुळशीपत्र घेतले. 'श्रीराम' असा नामोच्चार तोंडाने होत असताना त्यांच्या हातातील पंचपात्री निसटून खाली पडली. विठोबाअण्णा श्रीरामस्वरूपी विलीन झाले होते.

❀❀❀

विठोबाअण्णा गेले त्यावेळी त्यांचे दोन्ही चिरंजीव औंधास होते. त्यांना तेथून आणवून विठोबाअण्णांचे और्ध्वदेहिक पार पाडले. कऱ्हाडातील सोमवार पेठेत बहिरोबा आळीच्या दक्षिणेकडील रस्त्यावर विठोबाअण्णा राहात होते. तेथे विठोबाअण्णांची स्मृती म्हणून पादुका बसविल्या. सध्या त्या जुन्या घराच्या जागी ( २५४/२५५ सोमवार पेठ, कराड) 'पुष्पक अपार्टमेंट' झाले आहे, त्याच्या वाहनतळ क्षेत्रात सध्या त्या पादुका आहेत.

विठोबाअण्णांच्या मागे त्यांच्या घरी रामनवमीचा उत्सव बरीच वर्षे चालू होता. विठोबाअण्णांचे थोरले सुपुत्र सीताराम (बापूसाहेब) यांची मुलगी यमू. ओझर्डे (जि. सांगली) येथील देशपांडे हे तिचे सासर. कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिक्षक असलेले ( काही काळ ब्लॉकमेकिंगचा व्यवसाय करणारे ) माधवराव देशपांडे (एमजी) हे यमूचे चिरंजीव.

विठोबाअण्णांचे द्वितीय चिरंजीव रघुवीर ऊर्फ भाऊसाहेब यांना एक मुलगी व एक

मुलगा पांडुरंग. त्यापैकी मुलगी ही विवाहोत्तर राजे. तिचा मुलगा म्हणजे कऱ्हाडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिक्षक असलेले मल्हार रामराव राजे. त्यांची मुले राम व लक्ष्मण. राजे नंतरच्या काळात इनामदार आडनाव लावत. त्यांचे वंशज पुण्यात असतात.

विठोबाअण्णांचे नातू पांडुरंग रघुवीर यांचे पाच मुलगे. त्यांचे वंशज. बेंद्रे आडनाव लावतात. पुणे, कोल्हापूर, नाशिक येथे असतात.

❀❀❀



विठोबाअण्णांचे आराध्यदैवत






## विठोबाअण्णांची समाधी

# प्रज्ञा-प्रतिभेचा अलौकिक आविष्कार

## संत असलेला पंडित कवी

मोरोपंतांनंतर पंत पंडिती वळणाची रचना करणारे अव्वल इंग्रजी कालखंडातील अग्रगण्य कवी म्हणजे विठोबाअण्णा दप्तरदार. 'भक्तिरसावर भर देणाऱ्या संतकाव्यपरंपरेचा आदर्श त्यांच्यापुढे असल्यामुळे त्यांची पदे भावमधुर झाली आहेत.' असे प्रा. रा. श्री. जोग यांनी 'मराठी विश्वकोशा'त ( खंड १२, पृ.१२१८) म्हटले आहे.

❀❀❀

विठोबाअण्णांची बहुतेक सर्व ग्रंथरचना संस्कृतमध्ये आहे 'शिवस्तुति' (१८३४) 'गजेंद्रचम्पू' (१८३९) 'प्रबोधोत्सवलाघव', 'प्रयोगलाघव', 'नित्यक्रमलाघव', 'संकल्प', 'रामतापिनी', 'एकादशीनिश्चय', 'सुश्लोकलाघव', 'साधुपार्षदलाघव' हे त्यांचे ग्रंथ. केशवभट माटे या नावाचा एक गृहस्थ 'संधी करून वेद कसा म्हणावा' या विषयी गावोगावीच्या विद्वानांकडून अजिंक्यपत्रे घेत साताऱ्यास आला होता. त्यावेळी विठोबा अण्णा मसूर येथे होते. तेथे त्यांनी केशवभटास तीन वर्षे स्वत:कडे ठेवून घेतले आणि 'साधुपार्षदलाघव' हा ग्रंथ लिहून त्याची समजूत घातली. श्रीमद्भगवद्गीतेवर विठोबाअण्णांनी 'सत्पथलाघव' या नावाने गद्य टीका लिहावयास घेतली होती. बहुधा ती अपुरीच राहिली असावी.

'रामतापिनी' या ग्रंथात राम व शिव यांचा संवाद आहे. तर 'एकादशीविचार' ग्रंथात धर्मशास्त्राचे आधारे एकादशीसंबंधात विवेचन आहे. विशेष म्हणजे या ग्रंथात 'एकादशीश्राध्दविचार' म्हणून स्वतंत्र प्रकरण असून या दिवशी अन्नसंतर्पण न करता उपोषण करूनच संतर्पण करणे उचित असे विठोबाअण्णांनी म्हटले आहे. विठोबाअण्णांनी 'हेतुरामायण' हा ग्रंथ लिहिल्याची नोंद कृष्णाजी नारायण आठल्ये यांच्या चरित्रात आहे. प्राणिमात्रास पुनर्जन्म चुकलेला नाही हे विठोबाअण्णांना मान्य असल्यामुळे पुढील जन्मात आपल्या उपास्यदेवतेचा -श्रीरामाचा - वियोग होऊ नये म्हणून हा ग्रंथ सीतास्वयंवरापर्यंतच रचला. त्याचा पुढील भाग पुढील जन्मी आपल्या हातूनच पुरा व्हावा हा हेतू त्यामागे होता.

संस्कृत भाषा शिकण्यास, बोलण्यास सोपी पडावी म्हणून 'सत्पदार्थलाघव' हा ग्रंथ लिहिण्याचे विठोबाअण्णांनी ठरविले होते असे कृ. ना. आठल्ये चरित्रात म्हटले आहे.

❀❀❀

## सुश्लोकलाघव

श्रीराम हे विठोबाअण्णांचे उपास्य दैवत. त्या रामचरित्रांचे संकीर्तन वेगवेगळ्या पदांतून त्यांनी केले आहेच, पण 'प्रबोधोत्सवलाघव', 'प्रयोगलाघव', 'नित्यक्रमलाघव' अशा धर्मशास्त्रसंबंधित ग्रंथनामांतही रामाच्या 'राघव' या नावाचा 'लाघव' म्हणून मार्मिकपणे उपयोग करून विठोबाअण्णांनी आपल्या श्रीरामभक्तीचे आणि पांडित्याचेही दर्शन घडविले आहे. संस्कृत भाषेत 'र' आणि 'ल' या अक्षरांत अभेद मानला जातो म्हणून 'राघव' ऐवजी 'लाघव'. लाघव या शब्दाचा शब्दार्थांच्या उपयोगातील चातुर्य, चमत्कृती हाही अर्थ आहे.

विठोबाअण्णांनी 'सुश्लोकलाघव' हा संस्कृत ग्रंथ शके १७७५ ( इ. स. १८५३) मध्ये लिहिला. 'माझे कुलदैवत श्रीराम. ते माझ्या हृदयकमलात प्रगट झाले, त्याने ज्या विचारांची प्रेरणा केली, त्याप्रमाणे मी बोललो' असे या ग्रंथाविषयी विठोबाअण्णांनी म्हटले आहे. सुमारे साडेपाचशे श्लोक असलेल्या या ग्रंथात कोणतेही एक कथासूत्र किंवा विषय नाही. सर्व श्लोक स्फुट आहेत, पण विठोबाअण्णांच्या व्युत्पन्न व्यक्तिमत्त्वाची, व्यासंगाची आणि कल्पनाप्रचुर काव्यात्मकतेची ओळख या ग्रंथाने होते. सातव्या शतकात होऊन गेलेल्या भर्तृहरीच्या वैराग्य, नीती, शृंगार या तीन शतकांची आठवण करून देणारा हा ग्रंथ म्हणजे काव्यशास्त्रविनोदाची मेजवानीच आहे.

विठोबाअण्णांचे उपास्यदैवत श्रीराम असल्यामुळे, ग्रंथाच्या नावातील 'लाघव' शब्दाचा अर्थ राघव असा (संस्कृत भाषेतील 'र' आणि 'ल' या वर्णात अभेद मानला असल्यामुळे) उचित वाटतो. 'श्लोक' म्हणजे कीर्ती. त्यामुळे ग्रंथनामावरून श्रीरामचंद्राचे अलौकिक माहात्म्य या ग्रंथात असावे असे सकृत्दर्शनी वाटले तरी या ग्रंथातील ५५३ श्लोकांपैकी श्रीरामचंद्रांच्या वाटणीला आलेले आहेत. लाघव म्हणजे शब्दार्थांचा कल्पकतेने केलेला वापर त्यामुळे या ग्रंथातील श्लोकांमध्ये कवीचे कल्पनाचातुर्य ग्रंथनामाने सूचित केले आहे.

सुश्लोकलाघवश्लोकं विचित्रानंददायकम् ।
सकलाः स्पृह्यंत्येव हरिदासा विशेषतः ।।१४।।

म्हणजे या ग्रंथातील श्लोक सर्वांना ( सकलाः) आणि विशेषतः कलांची जाण असणाऱ्या रसिकांना ( स+कला) विलक्षण आनंद देणारे आहेत. कीर्तनकारांना ( हरिदासांना) तर विशेषच प्रिय होतील.

या ग्रंथातील श्लोकांपासून मिळणारा आनंदाचे मर्म विठोबाअण्णांच्या कल्पक शब्दरचनेत आहेत. एका शब्दाचे एकाहून अधिक अर्थ चपखलपणे लागू पडतील अशी

रचना म्हणजे श्लेष. ग्रंथनामापासून बहुतेक ठिकाणी श्लेषयोजना आहे वर उद्धृत केलेल्या श्लोकांचा 'कीर्तिवंत रामचंद्राचे चरित्र अपूर्व आनंददायी असून ते सर्वांना आवडेलच पण भक्तांना (हरिदासांना) विशेष आवडेल. असा दुसराही अर्थ प्रकट होतो. विठोबाअण्णांनी हा ग्रंथ कशाकरिता व कोणाकरिता लिहिला हे विशद करताना,

सुविचित्रवाणरचनं सुजनाः सुश्लोकलाघवं अयत ।
स्पष्टं नृणां प्रतिष्ठा दृष्टा नूनं यतो जनस्थाने ।।१४।।

(लोकांमध्ये प्रतिष्ठित म्हणून स्थान संपादन करू इच्छिणारांनी उत्कृष्ट शब्दरचना असलेल्या या ग्रंथाचे पठण करावे.) असे म्हटले आहे.

'सुश्लोकलाघव' या ग्रंथात एकच एक कथासूत्र किंवा प्रतिपाद्य विषय नाही. एकच विषय क्वचित तीन चार ठिकाणी देखील आलेला आहे. विषयांची विविधता, शब्दयोजनेतील नेमकेपणा, त्यातून प्रकट होणारे विविधार्थ पाहिले म्हणजे विठोबाअण्णांच्या विलक्षण व्यासंगाचा, सखोल अभ्यासाचा, रसिकतेचा प्रत्यय येतो. अध्यात्म-परमार्थ, नवविधा भक्ती, देवांची आणि साधु-संतांची वर्णने, वैद्यकशास्त्राचा आणि व्याकरणाच्या अभ्यासाचा अनुभव देणारी वर्णने, जर्दा, तंबाखू, मांजर, ढेकूण यासारख्या विषयांचा किंवा प्रापंचिक अनुभूतीतून निर्माण होणाऱ्या हास्यजनक प्रसंगांचा अंतर्भाव या ग्रंथातील श्लोकांत आहे. शृंगारपर वर्णनाचाही येथे अपवाद नाही.

माझे कुलदैवत श्रीरामचंद्र ते माझ्या हृदयकमलात प्रकट झाले व त्याने ज्या विचारांची प्रेरणा केली त्याप्रमाणे मी रचना केली ( श्लोक ५५१) असे सांगून आपल्या रचनेत दोष असतीलही म्हणून मी रचनाच करू नये की काय? कारण आपले सहज ( जन्मसिध्द) कर्तव्य सदोष असले तरी ते सोडता कामा नये असे श्रीकृष्णाने सांगून ठेवले आहे. (श्लोक ६) शिवाय या काव्याचे वाचक किंवा श्रोते ज्ञाते व समर्थ असल्यामुळे तेच माझे काव्य निर्दोष करतील. ( श्लोक ७ ते १०) असा विठोबाअण्णांचा विश्वास आहे.

कविता कितीही अलंकृत असली तरी तिच्यात काहीतरी श्लेष असल्याशिवाय मनाची तृप्ती होत नाही. (श्लोक ४४३) असे असले तरी वृत्ते, अलंकार, भगवत्कथा म्हणजे कविता नव्हे. मनोज्ञभावदर्शन म्हणजे कवित्व असल्याशिवाय तिला कविता म्हणता येणार नाही. ( श्लोक ४५५) याची जाणीव विठोबाअण्णांना आहे. ते म्हणतात, कवित्वाशिवाय कविता म्हणजे कंठशोष. (श्लोक ४५५)

विठोबाअण्णांच्या कवित्वाचा, कल्पकतेचा, शब्दयोजनाचातुर्याचा, व्यासंगाचा परिचय करून देण्यासाठी काही उदाहरणे देतो.

१. (श्लोक १७३) मोठमोठे विरक्त, जीवन्मुक्तलोकही रात्रंदिवस आपले चरण धरून बसतात, तेव्हा आपल्या चरणात अशी काय गोडी आहे, ती आपणही चाखून पाहावे असे विष्णूला वाटले. पण कोणी तरी हे पाहील व आपल्याला हसतील म्हणून जलप्रलय झाला त्यावेळी अर्भकाच्या रूपाने वडाच्या पानावर झोपून आपण अंगठा चोखू लागलो असा खुलासा 'पटस्य पत्रस्य पुटे शयानं' या उक्तीसंबंधात श्रीविष्णूने स्वत:च केला आहे असे या श्लोकात म्हटले आहे.

२. स्त्री कितीही सुंदर, सद्‍गुणी, अलंकार परिधान केलेली, गौरवर्ण असली तरी रघुतिलकविना म्हणजे लघुतिलकविना- कुंकुमतिलकाशिवाय ती शोधून दिसत नाही. आणि ललितसुगुणवेणि: सालंकाराऽपि सुवर्णाऽपि ।
रघुतिलकविहीना चेत्वाणी रमणीय नैव कल्याणी ।।१४६।। हा श्लोक वाणीलाही लागू पडतो. श्रीरामाच्या नावाशिवाय वाणीला शोभा नाही.

३. 'स्त्रीत्वं न पुंस्त्वं न नपुंसकत्वं
न वा विभक्तिर्वचनं न यत्र' (श्लोक ३४)
लिंग - वचन - विभक्ती लागत नाहीत असा शब्द म्हणजे अव्यय. आता हे अव्यय कोठे मिळेल तर स्वस्थानी म्हणजे पाणिनीच्या सूत्रात, स्वरादि गणाच्या स्थानामध्ये, असा वरकरणी व्याकरणविषयक वाटणाऱ्या श्लोकाचा पारमार्थिक अर्थ असा - 'अव्यय' म्हणजे अविनाशी परब्रह्म. ते प्राप्त करून घ्यावयाचे तर ते आपल्या मनात (स्वस्थानी) आत्मज्ञानानेच प्राप्त होईल.

४. शंकर, ब्रह्मदेव, महालक्ष्मी या सर्वांपेक्षा भगवंतांना बळीराजा प्राणापेक्षाही प्रिय होता कारण
तद्धेतु: प्रतिभाति मेऽस्य कृतिन: कालत्रयाबाधित: ।
देवेऽपि व्यभिचारिणी कचिद हो यैकांतसत्त्वात्मता ।।३७०।।
खुद्द देवांची सत्त्वशीलता कधी कधी ढळलेली आढळते पण बळीराजाची सत्त्वशीलता कालत्रयीही ढळली नाही.

५. लब्ध्वा वक्षस्यापि पदमियं तीर्थपादस्य विष्णो:
वारंवारं चरणकमलं सेवते स्नेहसांद्रा ।
कन्या धन्या सकलसरिता पत्युरत्युत्तमांगी
युक्तं स्त्रीणां भवति बहुशो मातृगेहे सुखाय ।।१७४।।
लक्ष्मीला विष्णूच्या हृदयात स्थान मिळाले तरी ती विष्णूचेच पाय चुरत बसते याचे

कारण काय, तर विष्णूच्या पायातून निघालेली गंगा ही समुद्राची पत्नी आणि लक्ष्मी समुद्राची मुलगी. आपल्या पतीची सेवा करण्याचे निमित्त करून लक्ष्मी वारंवार आपल्या आईच्या प्रेमाचे- माहेरचे सुख भोगते दुसरे काय ?

विठोबाअण्णा हे स्वत: रामदास-श्रीरामाचे अनन्य भक्त. 'सुश्लोकलाघव' ग्रंथात समर्थ रामदासांविषयी त्यांचे अनेक श्लोक आहेत. त्यापैकी काही श्लोकांचा किंचितसा परिचय येथे करून देत आहे.

१. मनुष्य द्रव्यार्जनासाठी धडपडत असतो. त्यापेक्षा त्याने श्रीरामाचे दास व्हावे, एकदा श्रीरामाचा दास झाले की त्याने तोंड फिरविले तरी त्याच्यामागे लक्ष्मी उभी राहील. ' न मागे तयाची रमा होय दासी' असे म्हणतातच.

कुत: श्रियै त्वं यतसे निकाम श्रीरामदासो भव मानवत्वम् ।
श्रीरामदासस्य पराङ्मुखस्य सदानपायिन्युपतिष्ठते श्री: ।।२००।।

येथे तोंड फिरविले ( पराङ्मुखस्य) तरी म्हणजे 'श्रीरामदास' ही अक्षरे उलट्या क्रमाने लिहिली की 'सदाऽअमराश्री' ( नेहमी, निरंतर लक्ष्मी ) असा कोटिक्रम आहे.

२. भिक्षा मागणारा असूनही समर्थ पदवीला पोचलेला आणि दास असूनही स्वामी झालेला असे ते रामदासांचे वर्णन करतात.

अकिंचनवरेण्योऽपि समर्थपदवीं गत: ।
दासोऽपि य: किल स्वामी स साधु: कोऽपि राजते ।।३३२।।

३. कनक आणि कांता यांचा त्याग करून जो श्रीरामाचा दास होईल तो परब्रह्माशी लीन होणार नाही असे कोणता सज्जन म्हणेल ?

यो हि श्रीरामदास: स्यात्परित्यज्य श्रीयं स्त्रियम् ।
असौ न परलीन: स्यादिति क: सज्जनो वदेत् ।।३३३।।

( येथे 'परलीन:' म्हणजे परळी गावात राहात नाही असे कोण म्हणेल ? असा श्लेषही साधला आहे.)

४. जो रामदास असेल त्याच्या घरात सदैव कल्याणच असते आणि अशा माणसाला दुर्गेचा म्हणजे पार्वतीचा पती- शंकर मोठ्या प्रेमाने मान देतो.

यो रामदास: स्यात्तस्य कल्याणस्थितिरालये ।
सभाजयति तं प्रेम्णा दुर्गाधीश: सदा शिव: ।।३३४।।

( जो रामदास असतो त्याच्या घरात कल्याण नावाचा शिष्य असतो आणि अनेक

दुर्गांचा म्हणजेच किल्ल्यांचा अधिपती असलेला शिवाजी राजा त्याचा प्रेमाने सन्मान करतो - असाही या श्लोकाचा दुसरा अर्थ करता येईल.)

५. गंगाधरप्रेमरसास्पदं यो य: सूर्यवंशैकमणिप्रवेक: ।
खरान्तक: शोभनलक्ष्मणाढ्य: स रामदास: किल राम एव ।।३३६।।
गंगाधराच्या प्रेमास पात्र झालेले सूर्याजीपंताचे हे पुत्ररत्न कसे ? तर ते निंदकाचा - दुर्जनांचा नाश करणारा आणि मस्तकावरील अवाळूने शोभून दिसणारा रामदास आणि राम यांच्यात फरक नाहीच. राम हा गंगाधराच्या म्हणजे शंकराच्या भक्तीने - प्रेमाचे स्थान, सूर्यवंशात श्रेष्ठ असलेला, खर नावाच्या राक्षसाला ठार मारणारा आणि लक्ष्मण या भावासह शोभून दिसतो.

६. श्रीरामाचा दास असलेले मारूती आणि समर्थ रामदास यांच्यातील साम्य वर्णन करणारा हा श्लोक.
ध्वस्तमहाशोकवनं दलिताक्षं सद्रुचाफलावासम् ।
कल्याणशिवप्रभुपदसोल्लासं रामदासमवलम्बे ।।३३७।।
मी त्या रामाच्या दासाना शरण आहे. (१) विशाल अशोकवनाचा विध्वंस करणारा, रावणाचा पुत्र अक्ष याला ठार करणारा, चांगल्या फळाची इच्छा करणारा, कल्याणाचेही कल्याण जो श्री रामचंद्र त्याच्या पायाची आनंदाने सेवा करणारा मारूती. (२) सर्व दु:खांचा नाश करणारा, अक्ष म्हणजे इंद्रियांवर ताबा ठेवणारा, चाफळ गावात राहणारा, कल्याण हा शिष्य व शिवाजी महाराज ज्याच्या चरणी उल्हास मानतात असा रामदास.

७. एका श्लोकात (३४२) रामदासांची निर्वाणतिथी सांगितली आहे. रामदासांचा निर्वाण शक १६०३ असल्यामुळे 'जो कोणी धन आणि दारा तृणवत मानून त्यांचा त्याग करून रामदास होईल तो जिवाच्या सोळा कला प्रथम नाहीशा करून नंतर रामामध्ये पूर्णपणे लीन होतो असे ३४३ या श्लोकात म्हटले आहे. माघ मास म्हणजे तपोमास चालू असताना 'तापसशेखर' - तपस्यांमध्ये श्रेष्ठ अशा रामदासांनी देहत्याग केला (३४४) 'दुर्मति नाम संवत्सराच्या फाल्गुनात उत्तराषाढा नक्षत्राची देवता अशा विवंचनेत राहण्यापेक्षा रामदासांनी माघमासातच देहत्याग करणे उचित वाटले तर शनिवारी गावाला गेलेला मनुष्य परत येत नाही असे ज्योतिषग्रंथातून म्हटले आहे. रामदासांना मोक्ष हवा असल्यामुळे त्यांनी शनिवारीच महाप्रयाण केले. (३४६)

८. चैत्र शुध्द नवमी प्रथम श्री रामचंद्रांच्या आणि नंतर रामदासांच्या जन्मोत्सवामुळे पुण्यकारक

होऊन गेली. त्यामुळे शुध्द नवमीला गर्व होऊन ती कृष्णपक्षातील नवम्यांना पाहून हसू लागली. त्यामुळे सर्व कृष्ण नवम्या रामदासांना शरण गेल्या व आमच्यापैकी कोणाला तरी पावन करावे अशी विनंती करू लागल्या. म्हणून जी कृष्णनवमी तपश्चर्या करीत होती. ती माघ म्हणजे तपमासातील नवमी रामदासांनी आपल्या देहार्पणाने पावन केली.

पुण्यादौ मधुशुक्लपक्षनवम्या श्रीरामजन्मोत्सवै-
क्षसस्याप्यक्ष तेन सा विजहसुस्ता: कृष्णपक्षस्थिता: ।
ता एनं शरणं गता हव सतां प्राणप्रयाणोत्सवै: कारूण्यातपसि स्थिता ।।३४८।।

९. रामदास आणि हनुमान एकच. स्वत: हनुमान रामयशाची ख्याती करण्यासाठी रामदासांचा अवतार घेऊन आले होते. (३५०)

किं युक्त्या प्रतिपादयामि बहुधा श्रीरामदासं सतां ।
नाथोऽवातरदेवरामयशस: ख्यातै हनुमानिति ।।

१०. दासबोधाचे वर्णन विठोबाअण्णा करतात.

बोधस्य यत्नं सृज राघवस्य दासो भव त्वं यत एष बोध: ।
न दासपृष्ठं त्यजतिति गुह्यं प्रबोधयन्भाति स दासबोध: ।।३५३।।

ज्ञानप्राप्ती करून घेण्यासाठी फक्त रामाचा दास हो, त्यामुळे तुला ज्ञानप्राप्ती होईल किंबहुना बोध (ज्ञान) त्याची ( म्हणजे दासाची) पाठच सोडत नाही हे रहस्य सांगण्यासाठीच दासबोधाचा अवतार झाला आहे.

( 'दास' आणि त्याच्या पाठोपाठ येणारा 'बोध' या शब्दांवर कल्पना लढविली आहे. )

'सुश्लोकलाघव' हा ग्रंथ संस्कृतमध्ये असला तरी रामदासांविषयीची एक आर्या विठोबाअण्णांनी चक्क मराठीत लिहिली आहे.ती अशी,

व्हाया सफळ मनुजजनि अवलंबुनि रामदासता राहे ।
श्री रामदास होता या जनि चाफळावगम आहे ।।३५१।।

मनुष्यजन्म सफळ होणे हे सर्वस्वी रामाचा दास होण्यावर आहे. एकदा रामाचे दास झाले की जन्माची फलप्राप्ती, सार्थक झाले असे समजावे.

( या जगातही चाफळ गावाचा लाभ आहे असाही एक अर्थ )

बडोदे येथे १९२१ मध्ये झालेल्या साहित्यसंमेलनात ग. वि. केतकर यांचे 'कीर्तन व आधुनिक साहित्य' या विषयावर भाषण झाले होते. कवी आणि कीर्तनकार यांचा

श्रमविभाग अधिक श्रेयस्कर होईल असे सांगत असताना उदाहरण म्हणून त्यांनी विठोबाअण्णा दप्तरदारांच्या 'सुश्लोकलाघव' ग्रंथाचा प्रसार कीर्तनकारांनीच केला असा अनुभव विशद केला. कीर्तनातून येणारे दोन दोन चार चार अर्थांचे श्लेषात्मक श्लोक एकत्र छापून निघावे अशी त्यायोगे लोकप्रवृत्ती झाली व मग तो ग्रंथ पुढे छापला गेला. (महाराष्ट्र साहित्य पत्रिका- विज्ञावि)

❀❀❀

## विठोबाअण्णांची पदरचना

विठोबाअण्णांचे शिष्य, सावंतवाडी येथील ह. भ. प. रघुनाथ रामकृष्ण भागवत यांनी विठोबाअण्णांची पदे जमविली. ती बेळगाव येथील श्री रामतत्त्वप्रकाश छापखान्याचे मालक आबाजी रामचंद्र सावंत यांनी 'पदसंग्रह' नावाने पुस्तकरूपाने छापून प्रकाशात आणली.

या पदसंग्रहातील संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांमधील सुमारे ९६ पदे आहेत. काही पदे संस्कृत- मराठी मिश्रित आहेत. आरत्या, कटाव, भूपाळ्या, अभंग, दिंडी, भजन असे अनेक पदप्रकार विठोबाअण्णांनी हाताळले असून वृत्ते, चाली, राग, ताल असे निर्देश आढळतात यावरून विठोबाअण्णांचे वृत्तरचनेवरील प्रभुत्व आणि संगीताची जाणकारी जाणवते.

विठोबाअण्णांची पदे संख्येने कमी असली तरी विद्वत्ता, भक्तिभाव, रसिकता, वृत्तवैचित्र्य, चमत्कृतिसौंदर्य आणि नवरसनिर्मिती ही त्यांच्या रचनेची लक्षणीय वैशिष्ट्ये आहेत. काव्यरचनेत ते स्वत:चा उल्लेख 'पंतविठ्ठल' असा करीत. विठोबाअण्णांनी पदरचना केली ती प्रामुख्याने कीर्तनात रंग भरावा यासाठी. 'श्रीरंगा दे मजला सत्संगा' या त्यांच्या पदात हृदयीची आर्तता जाणवते तर 'उत्तम जन्मा येऊनि रामा गेलो मी वाया' अशी खंत दुसऱ्या एका पदात व्यक्त होते. सुभद्राहरणातील त्रिदंडी संन्यास घेतलेल्या अर्जुनाचे चित्र एका पदात त्यांनी यथातथ्य वर्णिले आहे. 'मधुरिपु मधु विपिनी मधुकाली। सखि मधु मधुरतर मंजुळ वाजवितो मुरली' अशा पदामुळे जयदेवाच्या मधुरकोमलकांत पदावलीची आठवण होते.

कीर्तनाच्या आख्यानात उपयोगी पडावी अशी पदरचना ध्रुवचरित्र, प्रल्हादचरित्र, भीष्मप्रतिज्ञा, सुभद्राहरण, रूक्मिणी स्वयंवर, द्रौपदी स्वयंवर इ. विषयांवर केलेली असली तरी प्रामुख्याने श्रीरामकथेतील प्रसंगांवर विठोबाअण्णांचा भर दिसतो.

प्रत्येक चरणाअखेरीस 'राम' नाम येईल असे 'नामरामायण' त्यांनी रचले. युध्दकांडानंतर सातव्या उत्तरकांडात श्रीरामाचा निर्वाण प्रसंग आहे तो दु:खद असल्यामुळे विठोबाअण्णांनी फक्त राज्याभिषेकापर्यंतच रामचरित्र वर्णिले आहे. रामायणातील विविध प्रसंगांवरील विठोबाअण्णांची पदरचना म्हणजे अर्वाचीन काळातील ग. दि. माडगूळकरांच्या 'गीतरामायणा'ची गंगोत्रीच वाटावी.

विठोबाअण्णांच्या काव्यरचनेसंबंधीचा अनुभव कृष्णाजी नारायण आठल्ये यांनी 'सुश्लोकलाघव' ग्रंथाच्या प्रस्तावनेत वर्णिला आहे तो असा ' विठोबाअण्णांनी स्वत:च्या वाड्यातच स्थापन केलेल्या श्रीरामाच्या भजनपूजनाच्या वेळी आम्ही नित्य तेथे जात असू. अण्णा हे र, ट, फ अक्षरे जुळवून कविता करणाऱ्यांपैकी नव्हते तर त्यांची काव्यस्फूर्ती केवळ नैसर्गिक असे. त्यांच्या वाणीतून जे प्रेमोद्गार बाहेर पडत ते काव्यरूपानेच. जवळ असलेली त्यांची शिष्यमंडळी त्या कविता ऐकून उतरवून ठेवीत. ते सकाळ संध्याकाळ आपल्या उपास्यदैवतेपुढे बसून करूणा भाकू लागले म्हणजे लेकरू जसे आईपुढे गयावया करीत असते त्याप्रमाणे त्यांच्या वाणीतून निरंतर भक्तिरसाने, प्रसादाने व उपरतीने परिपूर्ण झालेले विचार काव्यरूपाने भराभर बाहेर पडत. त्या मनोविकाराने भरलेल्या अंत:करणामुळे नेत्रांतून घळघळ सारखे प्रेमाश्रू वाहत असत.'

विठोबाअण्णांसमोर संस्कृत-मराठी पंडित कवींचा आदर्श होता. मराठी पंडित कवींमधील ज्येष्ठ-श्रेष्ठ अशा मोरोपंतांविषयी आदरभाव व्यक्त करताना ते म्हणतात -

आर्यार्पित महानंद: सर्वलोककृतादर: ।
विराजते मयूरेश: कलाधरशिरोमणि: ।।४१४।।
अतिचित्रकलापाढ्य: सदारामपरस्थिति: ।
कारिकाजनिकानंदो मयूरेशो विराजते ।।४१५।।
इह मुख्यकलोपेत: को भवेत्कविनायक: ।
इति मीमांस्यमाने तु मयूरेश: स्मरत्यलम् ।।४१३।।

संस्कृतप्रमाणे मराठी भाषेतही अन्य ठिकाणी विठोबाअण्णांनी मोरोपंतांची महती गायिली आहे. ते म्हणतात

'आर्याछंदे जोडुनि रामायणभारतादि आयकवी ।
नायकवीर कवींचा ऐसा होईल अन्य काय कवी ?''
(मोरोपंत, ल. रा. पांगारकर )


विठोबाअण्णांविषयी असेच विचारावे लागेल.

‘अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी’ याप्रमाणे ज्ञानाची ऊर्मी आणि भक्तीचा जिव्हाळा यातून प्रकट झालेली विठोबाअण्णांची संस्कृत-मराठी कविता कीर्तनकारांच्या अनेक पिढ्यांनी श्रोतृसमुदायासमोर सुरस विवरण करून पोचविल्यामुळे अण्णांच्या कवित्वाची कीर्ती दूरवर पसरली हे खरे पण कीर्तनसंप्रदायालाही कालौघात ओहोटी लागली आणि प्रौढ संस्कृतप्रचुर शैलीमुळे पंत-पंडिती कविता पोथ्या-पुस्तकांत राहून गेली. विठोबाअण्णांचेही आता फक्त नावच राहिले आहे.


# विठोबाअण्णा दप्तरदारांची
# निवडक पदे

# अनुक्रमणिका


| क्र. | पद | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | आनंदाचा कंद | २५ |
| २ | श्रीरंगा दे मजला सत्संगा | २६ |
| ३ | अपराधक्षमापनस्त्रोतम् | २६ |
| ४ | उत्तम जन्मा येऊनि रामा | २७ |
| ५ | रत रे रत सखया | २८ |
| ६ | स्तंभी नरहरि अवतरला | २८ |
| ७ | पंचामृतपूजेची पदे | २९ |
| ८ | रामाची आरती | ३१ |
| ९ | जानकीची आरती | ३१ |
| १० | कृष्णाची आरती | ३२ |
| ११ | तुळशीची आरती | ३२ |
| १२ | नृसिंहाची आरती | ३३ |
| १३ | रामकृष्ण नरहरे | ३३ |
| १४ | रामजन्म | ३४ |
| १५ | श्रीरामगीत | ३५ |
| १६ | इजला माय म्हणावे काय ? | ३६ |
| १७ | पत्रिका | ३६ |
| १८ | सीतास्वयंवर | ३७ |
| १९ | घ्या हरीच्या नामा | ३९ |
| २० | सुभद्राहरण | ४० |



## विठोबाअण्णा दप्तरदार



'आनंदाचा कंद' (वाटेगावचा वासुदेव)

## आनंदाचा कंद

( प्रथम दोन चरण आरती भुवनसुंदराची ही चाल आणि पुढे कटावाची)

हरि हा आनंदाचा कंद ।।

आनंदाचा कंद उभा पुढे भक्त-सखा-गोविंद भगवानानंदाचा कंद ।।धृ।।

सजलनीरदश्यामतनू नवरत्नखचित- सौवर्ण-मुगुट शिरपेंच तुरा वरि कल्गी विराजित कुटिलालक निटिलासि कस्तुरीतिलक केशरीगंध ।। १।।

श्रवणिं मनोहर मकरकुंडले फुल्लगल्ल कर्णांत-दीर्घ-सुप्रसन्न-लोचन इंदुवदन तिलपुष्पनासिका कुंदरदन हनु अधरबिंबगत हास्य मंद मंद ।। २।।

कंबुकंठ कौस्तुभाभरणशुभपटीरपंक नवद्रवरूषित पीवरांसकेयूरविभूषित कनककसहरत्नतोडरप्रभानुभाषित शंखसुदर्शनगदासरोरूहलसच्चतुर्भुज ललितांगुलिधृतरत्नमुद्रिकावृंद ।।३।।

विशाल वक्षस्थळी रमाकुचकुंभकुंकुमालेपलिप्त श्रीवत्सलांछित सुवर्णयज्ञोपवीत मध्यवलित्रयबंधुर निम्ननाभि तनु रोमराजि लुठदुत्तरीयपट पारिजात नवकुसुम तुलसिकामिश्रहार पादाग्रचुंबि नभ भरूनि जयाचा मधुर सूटला गंध ।। ।।४।।

कटीतटी जरिकांठि पीत कौशेयवास पट वास सुवासित विचित्रशृंखल अगणितमणिझणिझणित मंजुलक्वणित किंकिणी विपुलतरोरूद्वंद्वविराजितजानुजंघ सुकुमार सरलतर कनकवलययुत रत्नतोडरें मंजुमंजुसिंजानहरिमंजीर परिष्कृत सहजरक्तमृदुवज्रअंकुशध्वजांबुजांकित वृत्तवृत्तउत्तुंगरक्तनखचक्रवालसत्पुण्य चंद्रिकाध्वस्त महभ्दृदयांधतमस मंदाकिनीमाहेरचरणयुगधृत रणरणिक जयाच्या क्षणिक ध्याने तुटती झटिति सर्व भवबंध ।।५।।

कोटिकोटिकंदर्परूप-लावण्यदर्पहर ध्यानमनोहर अनंतजन्ममनोमल पटलीनिर्मूलनकर भक्तिगम्यताप-त्रयभंजन आसेचनक ध्यानि पहाता वाटे जणु नयनात भरावे हुंगावे दृढ आलिंगावे की चुंबावे विसरतसे संसार सर्वही संतत याचा पंतविठ्ठला सहज लागला छंद ।।६।।

## श्रीरंगा दे मजला सत्संगा

( 'येबा विठोबा सुखकंदा देवकि' चाल )

श्रीरंगा, दे मजला सत्संगा आलो शरण तुला ।।१।।
रघुनाथा, आवडो तव गुणगाथा आ. ।।२।।
गोविंदा सोडविं विषय छंदा आ. ।।३।।
स्वानंदा, विसरवि विषय छंदा आ. ।।४।।
श्रीकृष्णा, दूर करी धन तृष्णा आ. ।।५।।
रघुराया, आवरी आपुली माया आ. ।।६।।
गोपाळा, उघडी चिन्मय डोळा आ. ।।७।।
श्रीरामा, दे मज भजन-प्रेमा आ. ।।८।।
घनश्यामा, नेई मज निजधामा आ. ।।९।।
भगवंता, तारी विठ्ठलपंता आ. ।।१०।।

❀❀❀

## अपराधक्षमापनस्तोत्रम्

अहं शैशवे क्रीडनासक्तचेता गृहीतं न ते जातुचिन्नाथ नाम ।।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं रघूत्तंसराम ।।१।।
अहं यौवने कामिनीकृष्टचेता गृहीतं न ते जातुचिन्नाथनाम ।। ।।२।।
मया नर्तिता लोकनिंदासु जिव्हा गृहीतं न ते जातचिन्नाथ नाम ।।३।।
कृता: कौतुकाभ्दूरिशो ग्राम्यगाथा: श्रुतंनैव ते नीरदश्याम नाम ।।४।।

❀❀❀

## उत्तम जन्मा येऊनि रामा

(पश्चात्तापपर 'प्राप्त होय जे निधान' च्या चालीवर)

उत्तम जन्मा येऊनि रामा गेलो उगा वाया ।।
दुष्टपातकी शरण मि आलो सत्वर तव पाया ।।धृ।।
आधी चुकलो मुकलो मी निज वेद स्वाध्याया ।।
कर्मे श्रौतस्मार्त न घडली सद्‌गती साधाया ।।
पुराण परिसुनि सादर झालो यशही न तव गाया ।।
स्वस्थपणे कधि नाही फावले तुजला पूजाया ।।१।।
आर्जविले बहु लवण भंजने व्याह्या जावाया ।।
क्षुधित अतिथि कधि नाही घेतला प्रेमे जेवाया ।।
उदार कर कधि केला नाही पैसा एक द्याया ।।
नाम फुकटचे ते हि न आले स्वामी वदना या ।। ।।२।।
कपट करूनिया निपट भोंदिल्या बहुत आया बाया ।।
केली धनगृह क्षेत्र स्त्री पशु शिशुवर बहु माया ।।
नित्य सजविली वसन भूषणें निंद्या ही काया।।
सिध्द ठेविली सदाहि रसना सज्जन निंदाया ।।३।।
वटवट निशिदिनी केलि चहुकडे मन हे रमवाया ।।
केले स्नान न संध्या जपतप दुष्कृत शमवाया ।।
क्षणहि न केला साधु समागम भवदेव निववाया ।।
सद्य: कामुक झालो पाहुनि परधन परजाया ।। ४।।
नाही विद्या कला कुशलता तुजला रिझवाया ।।
शुध्द मधुर वाणीही नाही तुजला विनवाया ।।
बुद्धिहि नाही न कळे काही शरणागत व्हाया ।।
थकलि मजल सर्वथा दयाळा स्वहित आचराया ।।५।।
हरि कनवाळू करि दीनावरि करूणेची छाया ।।
निगम नगारा गर्जे ऐसा निखिला कळवाया ।।
यावरि विश्वासुनियां आलो जवळ तुझ्या पाया ।।
शुध्द दगड हा पंत विठ्ठल स्वामी रघुराया ।।६।।

❀❀❀

## रत रे रत सखया !

रत रे रत सखया ! राघवमनामी किती रमशील कामी ।
रामनाम सुखधाम निरंतर सेवुनिया ज्यज कुमति रिकामी।।धृ।।
नानाजन्मार्जित दुरिते जळली । कृतपुष्पे फळली ।
तई या नरतनुची प्राप्ती कळली । मग मति का चळली ।।
लाज, लाज, करि काज स्मरुनि रघुराजपद विरम धनसुतधामी ।।१।।
दारादि विषयांचा भ्रमकृतवारा । समजुनि मति थारा ।
सारा मायिकचि मोहपसारा । सारा निःसारा ।
इष्टमित्र कुळगोत्र पुत्र सर्वथा वृथा भ्रम काकी मामी ।।२।।
करणे सत्संग गतमल करणे । शुध्दांतकरणे ।
सारणे हित वरणे संसृति तरणे । सत्कर्माचरणे ।
समज करुनि हित समज उमज मनिं देशिकवचने कवण कसा मी ।।३।।
ऐशा साधनेचि बहुजन तरले ।। शांतीने वरले ।
सहज देहत्वापासूनि सरले । निजपदि अनुसरले ।
करिसि भजन तरि तरसि पितरसह येविषयी विठ्ठल तुज हामी ।।४।।
( 'भक्तिमार्गप्रदीप' मधून )

❀❀❀

## स्तंभी नरहरि अवतरला

श्रीमद्भागवताच्या स्कंद ७ यात प्रभु, स्वभक्तरक्षणार्थ नृसिंहरूपानें स्तंभांत प्रकट झाले, त्या वेळचे हे पद

('दत्त दिगंबर मूर्ति' या चालीवर.)

स्तंभी नरहरि अवतरला ।। स्तंभी नरहरि अवतरला ।।धृ।।
सत्य कराया निज जन भाषित चराचरांतरिं संचरला ।।
केवळ न मनुज न केवळ मृग ।। विग्रह अत्यद्भुत धरिला ।।१।।
कडकडकड स्तंभ उकळला ।। गडगडगड रव नभिं भरला ।।
थरथरथरथर केश थरारती ।। करकर करि रद गुरगुरला ।।२।।
क्रुद्धतमें चिरयुद्ध करुनिया ।। उद्धत अरि निज करिं धरिला ।।
करुनि अंकगत खरतर नखरें ।। उदरी चरचरचर चिरिला ।।३।।
गगनिं अमरजनिं सुमनिं वर्षिला ।। जो वनिं मुनिजनिं मनिं धरिला ।।
नारदादिसुरगायकनिकरें परतर परपरम स्तविला ।।४।।

❀❀❀

## पंचामृत पूजेची अनुक्रमशः पदे

### पद १ ले ( राग-विभास) (दुग्धं)

दुग्धाब्धिशायिन् शरणागत सुखदायिन् भगवन्नमस्ते ।।धृ।।
दुग्धफेन धवलयशा दुग्धदिग्धसितहासा ।।
दुग्धप्रद उपमन्यो भो दुग्धस्नायिन् ।।१।।
दुग्धचौर्यलंपटा दुग्धदिग्ध अधरपुटा ।।
दुग्ध मधुरनामधेय दुग्धप्रदायिन् ।।२।।
दुग्धांबुधि तनयावर दुग्धांबुधिमथनचतुर ।।
पंतविठ्ठलाख्यकवेर्दुग्धप्रदायिन् ।। ।।३।।

### पद २ रे ( चाल व राग ''सदर'') (दधि)

नमोनमस्ते दधिवामन भो ।। धृ ।।
पूर्ण दयोदधि दधिभक्तप्रिय ।। दधि घटहरुनिजाय ।।१।।
दधिमथिता जननिसतप्रेमें ।। नवनीत चोरुनि खाय ।।२।।
दधिघट भंगुनि ह्मणे भुलला ।। दधि खा आणि दधिसाय ।।३।।
दधिघृतनवनीतप्रिय यशहि ।। प्रेमें विठ्ठलगाय ।।४।।

### पद ३ रे ( राग विलावल किंवा असावरी) (धृत )

रामकथाधृतधार सेवा राम ।।धृ।।
दृष्टि दोषहर तुष्टि वृष्टिकर ।। ज्ञानपुष्टि केदार ।। सेवा राम. ।।१।।
फार फार संसार विहारज ।। दाह सुधाकासार ।। सेवा राम ।।२।।
वित्तवासना पित्त चित्तगत ।। कृत्त करुनि करि गार ।। सेवा राम।।३।।
हंत संतमत पंतविठ्ठल ।। स्वांत शांति भांडार ।। सेवा राम।।४।।

### पद ४ थे ( राग विभाग, ताल तिताला )

### (मधु )

मधुरिपुमधु विपिनी मधुकाली ।।धृ।।
सखिमधु मधुरतरमंजुल ।। वाजवितो मुरली ।।१।।
मधुकरनिकरे मधुररवेंमधु ।। माधव कां त्यजिली ।। मधु.।। ।।२।।
मधुनि मधुनि विध सदृशमख ।। वधूतानलये मुरली ।। मधु.।। ।।३।।
विठ्ठलपदि स्वर्धुनिशी अधना चित्तवृत्ति जडली ।। मधु. ।।४।।

### पद ५ वे ( संतपदाची या चालीवर )

### ( शर्करा )

नाम शर्करा गोड हरिची नाम ।।
सोडविं दुर्मति खोड ।। हरिची. ।। धृ ।।
दुष्ट धृष्ट परि पुष्ट अहंकृति महिष होतसे रोड ।। हरिची. ।।१।।
हरउनि संशय सकल मनाचे ।। उपजविं सन्मति मोड ।। हरि.।।२।।
सुलभ सेवितां सहज होतसे ।। ब्रह्मपदाची जोड ।। हरि.।। ३।।
पंतविठ्ठल-प्रेक्षित ही भलि ।। भवतरणातरि जोड ।। हरि.।। ।।४।।

### पद ६ वे ( राग- विभास) आरतीचा ताल ( संस्कृत)

### (शुध्दोदकस्नानं)

जय देवि गंगे विमलतरतरंगे ।।धृ।।
कृतनिजसलिलनिमज्ञनकल्मषभंगे ।।
नारायण चरण नलिनरवराहितसंगे ।। जय.।।१।।
मज्ञत्सुरगजकरदलदब्जचलद्‌भृंगे ।।
द्युतिलसखलनविपोथितहिमवद्‌गिरिश्रृंगे ।। जय ।।२।।
सरयोषित्कुचकलशक्षरदगरूकपिंगे ।।
जलकल्लोलविलोलित पुरवैरिवरांगे ।। जय. ।।३।।
जगदुध्दृतये नटसि त्रिभुवनतलरंगे ।।
मातर्वितर जलभरं पंतविठ्ठलांगे ।। जय.।।४।।

## आरती रामाची

दशरथराजकुमारा धृतमुक्ताहारा ।।
शरयूतीरविहारा शमितक्षितिभारा ।।
करुणापारावारा कपिगणपरिवारा ।।
निर्गतनिखिलविकारा निगमागमसारा ।।१।।
जयदेव जयदेव जयसीतारामा ।।
सजलबलाहकश्यामा सच्चित्सुखधामा ।। जयदेव. ।।धृ।।
रविकुलराजललामा रम्यगुणग्रामा ।।
रूपविनिर्जितकामा रुद्रस्तुतनामा ।।
परिपालितसुत्रामा पूर्णसकलकामा ।।
विश्वविलासविरामा विठ्ठलविश्रामा ।। जयदेव. ।। २।।

❀❀❀

## आरती जानकीची

कारुण्यामृतसरिते कोटिसुगुणभरिते ।।
स्वाश्रितजनत्द्धृतदुरिते कविसंस्तुतचरिते ।।
नित्यमहोदयसुहिते निखिलानयरहिते ।।
विबुधमुनिव्रजमहिते विरचितविश्वहिते ।।१।।
जयदेवि जयदेवि जयजानकिमात: ।।
निजचरणनमज्जनजडिमतम:प्रात: ।। जय.।। धृ।।
प्रियतमवामांकगते तत्प्रेक्षणनिरते ।।
मुक्तालंकृतिलसिते मंदमधुरहसिते ।।
रक्तांबरपरिकलिते रघुवरतनुमिलिते ।।
भगवति मूलप्रकृते त्द्धृतविठ्ठलविकृते ।। जय.।।२।।

❀❀❀

## आरती कृष्णाची

नंदयशोदाबाला कुटिलालकजाला ।।
मृगमदतिलकितभाला अघमुरमधुकाला ।।
द्युतिजिततरुणतमाला दमितविषव्याला ।।
गोपीगोधनपाला धृतसुमनोमाला ।।१।।
जयदेव जयदेव जयराधाकृष्णा ।।
पूर्णब्रह्म सनातन हतनतजनतृष्णा ।। जय. ।। धृ. ।।
कृतकलिशमलध्वंसा पीतविलसदंसा ।।
चर्हिणपिच्छावतंसा कविजनकृतशंसा ।।
यमुनातीररिरंसा निहतकुमतिकंसा ।।
विठ्ठलमानसहंसा यदुवंशोत्तंसा ।। जयदेव ।। २।।

## आरती तुलसीची (संस्कृत )

दर्शनमात्रप्रत्द्दतप्रेक्षकजनदुरिते ।।
निर्जस्वरपरिशीलित निर्मलतरचरिते ।।
विकसत्सुयश: संचयतर्जितसुरसरिते ।।
भुवनत्रयविस्मयकर सद्गुणमणिभरिते।।१।।
जयदेवि जयदेवि जयमातस्तुलसी ।।
लक्ष्मीरमणप्रेयसि करुणारससरसी ।। जय.।।धृ।।
सेचनमात्रत्रासित दु:शमतमशमने ।।
संरोपणविधिविरचितहरिसन्निधिगमने ।।
तच्चरणाब्जदलार्पणकृतसंसृतिशमने ।।
स्पर्शनविश्वविरोधिनि विठ्ठलकृतनमने।।जयदेविज.।।२।।

## आरती नृसिंहाची

छविकृतरविपरिहासा क्षीराब्धिनिवासा ।।
शारदहिमकरभासा मंद मधुरहासा ।।
लक्ष्मीपूर्तविलासा कांचनमयवासा ।।
रक्षितनिजपददासा कृतदनुजत्रासा ।।
जयदेव जयदेवजयजयनरसिंहा
सत्यज्ञानसुखात्मक विदलित करिरंहा ।। जय।। ।।१।।
छत्रीभूतभुजंगा चरणच्युतगंगा ।।
भूताशतलसदंगा त्रिनयननि:संगा ।।
कलितसुदर्शनशार्ङ्ग अभयवरासंगा ।।
मुनिहृत्पंकजभृंगा विठ्ठलभवभंगा ।। जय ।।२।।

## रामकृष्ण नरहरे

## राग भूपाळी

( काही धरिली अढी. या चालीवर )

रामकृष्ण नरहरे स्वामिन् रामकृष्ण नरहरे ।
कधि करशील बा दया दयाळा! गर्भवास हा पुरे ।।धृ।।
काय करू मी बरे । सांगे काय ।।
कळो येति मज माझे दोष गुण चित्त परी नावरे ।।१।।
विषयी मन नावरे । सदोदित विषयी. ।।
कामक्रोध हे चोर लुटिति मज प्राण होती घाबरे ।।२।।
धाव धाव धाव रे । सत्वर धाव. ।।
बुडतो भवसागरी दीन हा उध्दरि अपुल्या करे ।।३।।
विचार मज न स्फुरे । काही विचार. ।।
केवि गति होईल म्हणूनिया जीव अंतरी झुरे ।।४।।
प्रार्थितसे आदरे, आता एक । प्रार्थितसे. ।।
असे करी तव नाम निरंतर पंत विठ्ठल स्मरे ।।५।।

## रामजन्म

('अमोल काया जाइल वाया' या चालीवर.) राग सारंग

पुष्पसमय मधुमास पुण्यतम शुल्कपक्ष तिथिते नवमी ।।
रवि मंगल गुरु शुक्र शनैश्चर ग्रह होते हे उच्चतमी ।।
कर्क लग्न नक्षत्र पुनर्वसु मेषराशिगत खररश्मी[१] ।।
उदगामिजीवेंदु मध्यदिन असतां संकुल कुसुमीं ।।
हृत्पद्मी दृढयोग युङ्मुनि चिंतिताति ज्या यमनियमीं ।।
चिन्मय निष्कल एक शुध्द इति विविध गाइला जो नियमी ।।
भक्तकामकल्पद्रुम तो प्रभु करुणरसे पूर्ण द्रवला ।।
श्रीमदयोध्यानगरी दशरथराजगृही हरि अवतरला ।।१।।
सांद्रपयोधरश्याम-मनोहर-रूप जया मन्मथ लाजे ।।
हिरेजडित शिरपेंच तुरा वरि शिरी किरीट वरवा साजे ।।
भाळि तिलक कविजना न वदवे कुटिलालककृत शोभाजे ।।
मकराकृति कुंडले श्रवणयुगिं सुप्रसन्न लोचनजलजें ।।
इंदुवदन नवकुंदरदन शुचि मंदहास अधरी भ्राजे ।।
ग्रामत्रय मधुरिमार्थ कंठी जडला जणु रेखाव्याजे ।।
मौक्तिकहार उदार सुभोभितमध्ये कौस्तुभ मणिरुळला ।।२।।
कटीतटी उद्दाम पीतपट मंजु किंकिणी गजबजती ।।
जानुजंघ सुकुमार गुल्फयुग वलयनूपुरें रुणझुणती ।।
सहज मृद्दंग आरक्त पदतलध्वजादि चिन्हें विराजती ।।
रम्यमनोहर सरळु अंगुली पूर्ण चंद्रसी नखकांती ।।
त्रिभुवन कलुष क्षपण निपुणतर मंदाकिनि झुळझुळ स्त्रवती ।।
पादयुगुल यत्क्षणिक चिंतने कर्मबंध सहसा तुटती ।।
दिव्यरूप पाहतां जननिच्या प्रेमपूर हृदयी भरला ।।३।।
प्रसन्नदिक्चक्रवाल सुंदर मंद गंधवह संवहती ।।
स्वयें हुताशन आयतनात: प्रदक्षिणार्चि: प्रज्वलती ।।
श्रृंगारुनि गृह रत्नतोरणें नागरिक ध्वज उभारिती ।।
द्वारपरिसरी कुंभदासिका शांति कुंभजल निषिंचति ।।
उजळुनि दीपज्योति कारूजन नीराजनविधि आचरति ।।
वारवधू सालंकृति नाचित मंजुल हरिहर गुण गाती ।।
तननं तननं धिगिति धिगिति धिक् थय्य थय्य रव घुंबरला ।।
श्रीमदयोध्या नगरी दशरथराजगृही हरि अवतरला ।।४।।

❀❀❀

## श्रीराम गीत

शरयूचे तीरी अयोध्यानगरी । भुक्ति-मुक्ति चारी । वसती जेथे ।।१।।
तयामाजी कल्पवृक्षांचे उद्यान । तेथे श्रीसदन । राघोबाचे ।।२।।
सोन्याचा मंडप पुष्पक विमान । रत्नसिंहासन । तयामाजी ।।३।।
त्यावरी बसला श्रीराम सावळा । जीवीचा जिव्हाळा । स्वामी माझा ।।४।।
दक्षिणहस्ती ज्ञानमुद्रा वीरासन । तेजप्रकाशन । वामहस्ती ।।५।।
रक्तपादतळ अंगुली सरळ । नखांची झळाळ । हिरकण्यांसी ।।६।।
वाळे सांखळीया घोटे मनोहर । बिरूदांचे तोडर । मिरविताती ।।७।।
जंघा पोटरीया जानु सुकुमार । पिवळा पीतांबर । शोभतसे ।।८।।
नवरत्नजडीत कडदोरा कटी । घागरियांची दाटी । जयामाजी ।।९।।
वृत्तनिम्न नाभी उदर त्रिवळी । हार वक्ष:स्थळी । मोतीयांचा ।।१०।।
कौस्तुभभूषणश्रीचे निकेतन । श्री वत्सलांच्छन । शोभताहे ।।११।।
स्वर्णयज्ञसूत्र केशराची उटी । शेला जरीकाठी । झळकताहे ।।१२।।
त्रिरेखांक कंठ दीर्घबाहुदंड । ज्यासंगे कोदंड । शोभतसे ।।१३।।
दंडी वाक्या हाती कडीतोडे गोमटी । दशांगुली दाटी । मुद्रिकांची ।।१४।।
रम्य हनुवट रक्त अधरपुट । वदनी गोमट । मंदहास्य ।।१५।।
हास्ये फुल्लगल्ल तीळपुष्पनासिका । नयनांची रेखा आकर्णान्त ।।१६।।
भुवयांचा प्राकार विशाल भालस्थळ । मकर कुंडल श्रवणामाजी ।।१७।।
केशराचे गंध त्यामाजी रेखिला । कस्तुरीचा टीळा । घवघवीत ।।१८।।
कुरळ कुंतल मुकुट सोनीयाचा । तुरा मोतीयाचा । खोविलासे ।।१९।।
पुढे वायुसुत जोडोनिया हात । उभा हनुमंत । भक्तराज ।।२०।।
पृष्ठभागी बंधू लक्ष्मण पवित्र । धरूनीया छत्र । उभा राहे ।।२१।।
वामांगी बैसली त्रैलोक्यमोहिनी । जनकाची नंदिनी । माय माझी ।।२२।।
भरत शत्रुघ्न मदनाची मूर्ती । चामरे ढाळिती । दोही भागी ।।२३।।
सुग्रीव वानर भक्त बिभीषण । वारीती व्यजन । मंद मंद ।।२४।।
पूर्णब्रह्मराम योगीया विश्राम । निजभक्ताचे काम । पुरविता ।।२५।।
ऐसिया ध्यानाचा पंत विठ्ठलास । लागो निजध्यास । सर्वकाळ ।।२६।।
गाता ध्यानगीत रूप राघोबाचे । ठसावेल साचे । मनामाजी ।।२७।।

## इजला माय म्हणावे काय ?

कैकयीने आग्रहपूर्वक रामास दंडकारण्यात पाठविले. पुत्र वियोगाने दशरथ स्वर्गवासी झाला. हे आपल्या मातोश्रीचे अनुचित वृत्त पाहून क्रोधाने व्याप्त होऊन भरत म्हणतो.

राग जोगी ('माझा कृष्ण' या चालीवर)

इजला माय म्हणावे काय ।। केवळ कृत्या ही ।। धृ।।
जगदानंद जिणे रघुराय ।। नीलोत्पदलदल-कोमल-पाय ।।
विपिना घालविला अन्याय ।। त्रिभुवन हाय हाय करी ।।१।।
ऐसें सत्य इचें मनिं आणा ।। ही तो राक्षसी स्पष्ट जाणा ।।
दशरथराय जगाचा राणा ।। वृध्द प्राणा सांडविला ।।२।।
श्रीरामाचा करोनि कांटा ।। रचिल्या तीन तिघांमधि वाटा ।।
पदरी पातकाचा सांठा ।। या पोटां म्हणुनि आलो ।।३।।
मजवरि विटेल राम अनंत ।। कैसा काय होइल पंथ।।
ऐसी भरत करित बहु खंत ।। विठ्ठलपंत हंत म्हणे ।।४।।

## पत्रिका

सीतास्वयंवर निश्चित झाल्यावर मिथिलाधीश जनकाने अयोध्यापती दशरथ महाराज यांना जे निमंत्रण पाठविले -

स्वस्तिश्रीमद्ब्रह्मनिष्ठजनवरिष्ठमुनिवसिष्ठसमादिष्टस्वाभीष्टपरिचर्याविसृष्ट धैर्यशौर्यपरमैश्वर्यमहौदार्यचातुर्याद्यार्य लक्षणमर्यादातिशायिनं,निजभुजस्तंभबलदंभविजभणारंभस्तंभितजंभरिपुवीर्यसंभृताराातिकदंवसंभावितशंबरादिविविधमायाडंबरविज्ञानं, मैत्र्यादिगुणसुंदराय, पुरंदराय, प्रत्यर्पीतदनुजत्द्दतमाहेंद्राधिष्ठानं, कौसलपूषणं, अदृष्टश्रुतदूषणं, भूपमौलिविभूषणं, साकेतपुरतोषणं, सत्यधर्माणं, उदारकर्माणं, जगद्विकीर्णशर्माणं, दशरथवर्माणं महाराजं प्रति ।।विगतवैक्लव्येन ।। मिथिलावास्तव्येन भव्येन याज्ञवल्क्यप्रसादलब्धनिरतिशयशर्मणा जनकवर्मणा प्रेम्णा विरचितविविधविनतयः समुल्लसंतु ।। विशेषस्तु रसाप्रसादलब्धायाः सीताऽभिधायाः कन्यायाः स्वयंवरार्थं कल्पितंस्मरध्वंसनशरासनसद्गुणसमारोपणे महापणं पारयितुं मिलिता दशकंधरप्रभृतयोनृपतयः नव पल्लव - कोमल शते । तत्र सर्वधा भग्नगर्वमहापर्वते

शर्वभक्तेऽखर्वलज्ज्ञापरिप्वक्तेदंतचर्वणं कुर्वंति अपरपर्वणि शर्वरीपताविव दृगविषयतामापन्ने नत[illegible] दशानने ततोऽतिचकितेषु नृपतिसुतेषु भगवतो गाधिपुत्रस्य परमपवित्रस्य पाद[illegible]सुप्रसादलवानुगृहीतो रंगसंगत आयुष्मान् रामभद्रः । चंडकरकुलमंडनो खंडपरशोश्चंडमपि कोदंडं गंडशैलमिव आखंडलईक्षुदंडमिव वावेतंडः । चलत्कुंडलमंडितगंडतलं खंडयति स्म मंडले पश्यति क्षितिपतीनां यन्नि-ह्रादमात्रेण स्फुटदकांड इव ब्रह्मांडभांडं तदनुकृतार्थं मन्या परमधन्या भुवनमान्या भूमिकन्या वन्या परमपुष्पस्त्रजा अगण्यपुण्यलाव-ण्यकारूण्याद्यखिलगुणाऽरण्यं अनरण्यदायादं सकलशरण्यं ब्रह्मण्याग्रण्यंरघुवरेण्यं संवृणोति स्म। तुष्टिश्चावालनथानंतरं भाविमहामंगल प्रसंगनिर्वर्तनेन सर्वेषां मनीषिणां चर्मचक्षुषां तोपाधानाय दोषापतिरिव योपासाहित्येन सभृत्येन श्रीमता सोपाध्यायेन ससहायेन ससामंतेन ससाकेतजनेन सायुधेन सबाहनेन ससैन्येन पन्नदर्शनविरतिरेव प्रयाणकालतां नेतव्येत्यलंपल्लवितेन ।।१।।

## सीतास्वयंवर

राम लक्ष्मण, जानकीसह अत्रिऋषीच्या आश्रमात गेल्यावर तत्पत्नी अनसूया इने, सीतेची वेणीफणी करीत असतां, तिचा स्वयंवर वृत्तांत विचारल्यावरून तो जानकी सांगते.

('उध्दवा सांत्वन' या चालीवर)

आयके अये ऋषिजाये, मज वरिले श्रीरघुराये ।।धृ।।
ब्रह्मनिष्ठ गिथिलाधिपती, जनकाव्हय राजा सुकृती ।।
व्यास याज्ञवल्क्यप्रभृती मुनिजन यद्गुण गाती ।।
तो स्वयें एकदा सुमती करू इच्छी अध्वरवितती।। चाल।।
शुद्ध्यर्थ भूमि नांगरता ।।लाभले मि त्या शुभनिरता ।।
मानुनियां मज निज दुहिता ।। पाळिले नृपें सदुपायें ।।१।।
जो कोणी वीर प्रतापी, गुण चढविल या शिवचापी ।।
तो देव असो अथवाऽपी।। मानव वा दानव पापी ।।
ही कन्या त्या गुणवापी ।। देइन हे वचन नभापी ।।चाल।।
पद दारूण ऐसा करूनी ।। मनि धैर्यशिलोच्चय धरूनी ।।
श्रीहरिचे चरण स्मरुनी ।। मांडिले स्वयंवर न्यायें ।।२।।
भूमंडळि लिहिली पत्रे, मिळविले सकळ कुलगोत्र ।।

सोयरे आप्तजन मित्र धावले वीर नृपपुत्र।।
ऋषिमंडळ परमपवित्र, पातले पहाया चित्र।। चाल।।
नवमणिमय मंडप साजे ।। संपूर्ण मिळाले राजे ।।
नभिं गभीर दुंदुभि वाजे ।। गणिकाजन मंजुळे गाये ।।३।।
इतक्यात आलाग बाइ मेला दशवदन शैलसा ठेला ।।
सर्वांस त्रास उदियेला, त्याणे गर्व वाद बहु केला ।।
मग दावित भुजलीलेला, शिवकार्मुक सन्निध गेला ।।चाल।।
निज बाहुबळे बहु कढला।। परि नाहिं चापिं गुण चढला ।।
शेवटी उरी धनु पडला ।। अंबिकादयेचे छाये ।।४।।
भयचकित सर्व मग नृपती, कोणीहि न वर मुख करिती ।।
प्रार्थितां करूनिया विनती।। हूं म्हणता कोणि न उठती ।।
हे पूज्य आम्हां धनु म्हणती ।। कर जोडुनि दुरुनच नमिती।। चाल।।
तव गर्जे मदुपोध्याय । निर्वीर भूमि अजि काय।।
शेवटां केवि पण जाये ।। ऋषि मंडळि मग तो पाहे ।।५।।
रघुसिंहशाब तव उठला ।। वीरश्रीविभवे नटला ।।
गुरूकृपादृगमृते भिजला ।। क्षण सस्मित पाहूनि मजला ।।
ठेउनिया गुरुपदि निटिला ।। ऋषिसंघ सर्व नमियेला ।।चाल।।
सावरुनी कुंतल जाला।। कटिं कशिला दृढ मृगछाला।।
शिवचापा सन्निध आला ।। विप्राशीर्वादि सहाये ।
नवपल्लव कोमल हाते ।। उचलुनिया शिवचापातें ।। ६ ।।
दृष्टिचें न लवता पातें ।। चढविले चापिं सीतातें ।।
ओढितां सहज भंगते ।। पावलें लाज भूपातें ।। चाल।।
वर्षती देव कुसुमांला ।। मी अर्पियली वरमाला।।
वंदितां पादपद्माला ।। आनंद न मानसिं माये।। ७।।
धाडुनियां रथगजवाजी ।। आणविले त्वरे मामाजी ।
सौवर्ण मंडपामाजी । विद्क्षत्र ब्रह्म समाजी । जनकराय अध्वरयाजी ।।
राघवा यथाविधि पूजी ।।चाल।। रोमांच कंचुकें सजला ।।
स्त्रवदश्रुनिर्झरि भिजला।। राघवा अर्पिले मजला।।
जलसहित कनक समुदायें ।। ८।।

द्विजभुक्ति दक्षिणा मोठी।। मोत्याने भरल्या ओटी ।।
खेळलों हळदफळगोटी ।। सहभोजन विडिया होटी ।।
नामग्रही कौतुक पोटी ।। किती सांगुं सोहळे कोटी ।।
चाल।। प्रभुपंत विठ्ठलस्वामी ।। जो नित्यनिरत निज धामी ।।
होउनियां स्यंदनयामी ।। मजसहित स्वपुरा जाये ।।
आयके अये अनुसूये, मज वरिलें श्रीरघुरायें ।।९।।

## घ्या हरिच्या नामा

प्रल्हाद, दैत्यबालकांस उपदेश करितो
घ्या हरिच्या नामा, लिहिता कशास ओनामा ।। गड्यांनो घ्या.।।धृ।।
सांगतो ऐका एक वर्म ।। दुर्लभ हें मानुषजन्म ।।
यास्तव आचरुनि सत्कर्म ।। पहावा भागवती धर्म ।।
दु:खसें प्राप्त होय शर्म ।। यत्न त्या कशासरे परम ।।
न पावे हरिवांचुनि क्षेमा ।। लिहि.।। १।।
शरण सद्गुरुला जावे ।। हरिभजनी नच लाजावे ।।
हरिचे सगुण रूप पहावें ।। निर्मल भावे पूजावे ।।
हृदयी पदपद्म घ्यावे ।। सर्व हरि असेंच समजावे ।।
सांडुनि हृदयांतुनि कामा ।। लिहि.।।२।।
आपुल्या हृदयी जो वसता ।। नलगे प्रयास त्या भजता।।
धनसुतजायेची ममता ।। हरिचें चरणांबुज नमितां ।।
विठ्ठल नेइल निज धामा ।। लिहि. ।।३।।

## सुभद्राहरण

अर्जुन सुभद्रेसाठी कृष्णाच्या आग्रहाने त्रिदंडसन्यासवेष स्वीकारून चातुर्मास राहण्याच्या निमित्ताने द्वारकेत जातो. तो थाट कवि वर्णितात.

पद ( 'गड्यांनो घ्या हरिच्या' या चालीवर )

अर्जुन होऊनि सन्यासी ।। झाला द्वारवतिवासी ।।धृ।।
वरवा परिकर लंगोटी ।। गुलाबी खडखडीत छाटी ।।
प्रणवोच्चार स्थिति होटीं ।। स्मरणी चालतसे बोटी ।।
अंगी विभूतीची ऊटी ।। कपटीवेष कांति मोठी ।।
पाहुनि जन भुलले त्यासी ।। झाला द्वारावति वासी ।।१।।
लोटली द्वारावति सारी ।। झाली खेट मठद्वारी ।।
पुजाया नाना उपचारी ।। वेळा साधितातति चारी ।।
दुर्लभ यतिदर्शनभारी ।। ढोंग माजविता कंसारी ।।
पडल्या भेटीच्या राशी ।। झाला।।२।।
यतिची सतत मौनवृत्ती ।। समाधिस्थिति बहु एकांती ।।
वेदांतस्थ रहस्योक्ती बोलता फार सरस युक्ती ।।
त्यातुनि तीव्रतर विरक्ती ।। उपजली सर्व जना भक्ती ।।
येऊनि बसति तयापाशी ।। झाला. ।।३।।
वर वर वर वियोग मुद्रा ।। गडबडतसे मनि सुभद्रा ।।
भरते येत स्मरसमुद्रा ।। रात्रंदिवस नये निद्रा ।।
हे एक ठावे यादवेंद्रा ।। उपजवी प्रीती बलभद्रा ।।
कुतूहल पंतविठ्ठलासी ।। झाला द्वारावतिवासी ।।४।।

❀❀❀

# परिशिष्ट

विठोबाअण्णांचा थोरला मुलगा सीताराम औंध येथे पंतप्रतिनिधींच्या आश्रयास होता. विठोबाअण्णांचे द्वितीय पुत्र रघुवीर ऊर्फ भाऊसाहेब हे कऱ्हाडास विठोबाअण्णांच्या सहवासात बरीच वर्षे होते. विठोबाअण्णांनी त्यांना शास्त्रपरिचय करून दिला व भागवतरहस्य समजावून सांगितले. रघुवीर यांच्याजवळ कवित्वाचीही कला होती. त्यांनीही संस्कृतमध्ये कविता केल्या असून विठोबाअण्णांच्या 'गजेंद्रकचंपू' इ. ग्रंथाना त्यांच्या संस्कृत टीका आहेत. वडिलांच्या निधनानंतर दु:खित मनाने वडिलांवर पुढीलप्रमाणे कविता करून आपली पितृभक्ती व्यक्त केली.

विठ्ठलपंत संत साधु भजू या भवी आम्ही ।।धृ।।
कऱ्हाडास वस्ति करूनि, बिऱ्हाडास आलो म्हणूनि,
घबाड हाचि देह गणुनि, जाणुनि रघुनाथ नमी ।।१।।
बेंद्रे उपनाम धरूनि, हेंद्रे जन उध्दरोनि,
केंद्रेचा सूर्य जसा गृहामाजी भक्तजननी ।।२।।
खंडन विधवाविवाह मंडन करी धर्म महा ।
दंड करी पंडितासी । भंड म्हणुनि त्याग करी
हेतु रामचरित करूनि । सेतु हाचि भाव मनी ।
याचि पथे जावे म्हणुनि कृष्णाते बोध करी ।।४।।

या पदात विठोबाअण्णांचे संक्षिप्त चरित्र त्यांनी सांगितले आहे, तर वडिलांची प्रतिमा शब्दांकित केली आहे ती अशी :

"टिळे द्वादश स्पष्ट मुद्रा विराजे ।
गळा मालिका कुंडले कांति साजे ।।
मुखी रामनामे जपे माळ हाती ।
स्मरो विठ्ठलाख्या गुरू भव्य मूर्ती ।।२।।
शिरो वेष्टना बांधिजे साधु बाणे ।
परिधानवस्त्रे धरी शुभ्र वाणे ।।
असे गौरकान्ति करी ध्यान चित्ती ।
स्मरो विठ्ठलाख्या गुरू भव्य मूर्ती ।।३।।

रघुवीररावांनी पंढरीचा विठ्ठल आणि वडील पंत विठ्ठल यांचे तुलनात्मक वर्णन मोठ्या मार्मिकपणे केले आहे तो संस्कृत श्लोक असा -

''बोधलाभजनरंजनो जनिप्रेमगीतरसिक: कवीश्वर: ।
ब्रह्मपध्दतिसुतोषभागयं विठ्ठल: स इति को न संवदेत् ।।१।।

बोधला नामक भक्ताच्या भजनाने संतोषित होणारा, जनाबाईने प्रेमाने गायिलेल्या गीतांची आवड धरणारा, कवीश्वर म्हणजे सर्वज्ञ आणि ब्रह्मज्ञानपध्दतीच्या मार्गात तृप्त होणारा पंढरीचा विठ्ठल असा या श्लोकाचा एक अर्थ, तर बोध-लाभ-जनरंजनन (उपदेशाचा लाभ देऊन लोकांचे रंजन करणारा), जनी-प्रेम-गीत-रसिक ( म्हणजे लोकांसाठी भक्तीची कवने गाणारा) ब्राह्मणांच्या आचारविचाराने संतोषित होणारा विठ्ठल म्हणजे विठोबाअण्णा.

❁❁❁

## संदर्भ ग्रंथ

**अर्वाचीन चरित्रकोश** संपादक सि. वि. चित्राव, पुणे १९४६

**भारतीय संस्कृती कोश** (खंड ४ व १०) संपादक महादेवशास्त्री जोशी, पुणे १९८७

**मराठी विश्वकोश** खंड १२

**आत्मचरित्र** भाग १ भवानराव पंत, औंध १९४६

**न्या.म.गो. रानडे यांचे चरित्र** न. र. फाटक पुणे आ.२ १९६९

**साहित्यिक कऱ्हाड** पु. पां. गोखले कऱ्हाड १९४१

**कऱ्हाड : समग्र दर्शन** संपादक वि. पु. गोखले व का. धों. देशपांडे कऱ्हाड २००८

**पदसंग्रह** : विठोबाअण्णा दप्तरदार आ. ४ १९०५

**सुश्लोकलाघव** विठोबाअण्णा दप्तरदार, पुणे १९१७ आ. २ १९२२

**केरळकोकिळ** वर्ष ७ अंक ९ संपादक कृष्णाजी नारायण आठल्ये सप्टेंबर १८९३

**महाराष्ट्र कविचरित्र** ज. र. आजगावकर

**मराठी वाङ्मयकोश** खंड १ गं. दे. खानोलकर


**नाचू कीर्तनाचे रंगी** प्रा. डॉ. यशवंत पाठक


❁❁❁

# विठोबाअण्णांच्या चरित्रातील प्रमुख घटना

| इ.स. | घटना |
|---|---|
| १७६० | बाळाजीपंत बेंद्रे कऱ्हाडात दप्तरदार म्हणून आले. |
| १७८२ | महादजी बाळाजी बेंद्रे यांचा जन्म. |
| १८१४ | विठोबा अण्णा दप्तरदार यांचा जन्म. |
| १८२६ | विठोबाअण्णांचा विवाह. |
| १८३० | कऱ्हाडात कृष्णाबाई उत्सव सुरू. |
| १८३१ | विठोबाअण्णांचे ज्येष्ठ पुत्र सीताराम यांचा जन्म. |
| १८३४ | 'शिवस्तुति' ग्रंथाची रचना. |
| १८३८ | कृष्णाकाठी मारूती मंदिराची उभारणी. |
| १८३९ | 'गजेंद्रचम्पू' काव्यरचना |
| १८४२ | वडील महादजी यांचे निधन |
| १८४३ | पत्नीचे निधन |
| १८४५ | आईचे निधन |
| १८४६ | मंत्रोपदेश |
| १८५३ | 'सुश्लोकलाघव' रचना |
| १८५८ | पक्षाघाताने आजारी. |
| १८६३ ते १८६७ | खोडशी येथे कृष्णा नदीवर धरण. |
| १८६३ | शिदुभाऊ गरूड यांच्याकडील यज्ञ |
| १८६५ | मारूती उपासक मंडळाची स्थापना |
| १८६७ | 'प्रयोगलाघव' ग्रंथरचना |
| १८६८ | विधवा पुनर्विवाह वादातील सहभाग. |
| | 'विवाहतत्त्व' ग्रंथरचना |
| १८७३ | निधन |

# दप्तरदार (बेंद्रे) घराण्याचा वंशवृक्ष





कृष्णाकाठावरील वीर मारूती मंदिर



आपल्या प्रतिभासंपन्न पांडित्याने मराठी भाषेला गीर्वाणवाणीचा दिमाख आणणारे कऱ्हाडातील एक सत्पुरूष म्हणजे

## विठोबाअण्णा दप्तरदार

(१८१४-१८७३)

त्यांनी अनेक गेय पदांची निर्मिती करून कीर्तनकारांच्या अनेक पिढ्यांना तो ठेवा दिला.

आपल्या कवित्वाने, कर्तृत्वाने त्यांनी कऱ्हाड शहराचे नाव भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अधोरेखित केले.

त्यांच्या द्विशतसांवत्सरिक जयंतीनिमित्ताने ही त्यांची वाङ्मयी पूजा.